Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

# तत्त्वज्ञान ( स्पेशल 2 )

## पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास

## ( प्राचीन,मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंड )



# प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंड

## युनिट 1: सॉक्रेटीस आणि सॉक्रेटीसपूर्व तत्त्वज्ञ:

## (Pre-Socratic Philosophers and Socrates )

1.1 विश्वशास्त्रज्ञ - तत्त्वज्ञ :
थेल्स, अनाक्झिमेंडर, अनाक्झिमेनीस, अनॉक्झिगोरास , एम्पिडॉक्लस, डेमॉक्रिटस.

1.2 पायथागोरस : संख्या , विश्व आणि आत्मा
हेरॅक्लिटस : लोगोस, भवन
पार्मेनायडिस : सत्.

1.3 सोफिस्ट : सापेक्षतावाद, संशयवाद.

1.4 सॉक्रेटीस : मूल्ये, ज्ञानाची संकल्पना .

Department of Philosophy, Sangamner College Sangamner

---

## प्रस्तावना

पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि पाश्चात्य - युरोपीय संस्कृतीचे मूळ ग्रीक तत्त्वज्ञानात आहे. ग्रीक विचारांचा प्रारंभ आशिया खंडाच्या आशिया मायनर प्रांतातील आयोनिया नावाच्या वसाहतींत झाला.प्राचीन काळी ग्रीस या नावाचा देश नव्हता. तो अनेक वसाहतींचा समूह होता.ग्रीस हे नाव नंतर मिळाले.ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास म्हणजे पाश्चात्य विचारांना कसे वळण मिळाले, त्यांना कोणता व कसा आकार मिळाला, हे लिहिणे आहे. *"आजच्या जगात आंधळ्या नैसर्गिक शक्तिंशिवाय अशी कोणतीही गोष्ट नाही की जी ग्रीक नाही"*[1] असे म्हंटले जाते; इतके ग्रीक तत्त्वज्ञान मूलभूत आहे.

ग्रीस हा भारतातील कोकणासारखा छोटा, देखणी समुद्रकिनार लाभलेला डोंगराळ देश आहे. डोंगराळ भागामुळे प्राचीन ग्रीकांनी इतरत्र स्थलांतर करुन वसाहती स्थापन केल्या.या वसाहती म्हणजे छोटी शहरे

---

[1]"Except the blind forces of Nature, nothing moves in this world which is not Greek in its origin." हे विधान सर हेन्री मेन **Sir Henry James Sumner Maine** (15 August 1822 – 3 February 1888) यांनी केंब्रिज विद्यापीठात 'Popular Government' या 1885 साली दिलेल्या व्याख्यानात केले होते. या विधानाचा प्रभाव तत्कालिन विचारवंतांवर इतका होता की जगप्रसिध्द अमेरिकन फलवादी तत्त्ववेत्ते जॉन ड्युई (**John Dewey** (October 20, 1859 – June 1, 1952)) यांनी त्यांच्या *The Influence of Darwin on Philosophy and Other Essays* (1910) या पुस्तकाच्या "Intellengence of Morals" या तिसऱ्या प्रकरणाची सुरुवात या विधानानेच केली. मेन हे ईस्ट इन्डीया कंपनीच्या सेवेत भारतात काही काळ राहिले. ते काही वर्षे कलकत्ता विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सलर होते. त्यांनी सरकारी अधिकारी म्हणून भारतात बऱ्याच सुधारणा केल्या.

असल्याने त्यांना **'नगर - राज्ये' (City - States)** असे म्हंटले जाते. या नगरराज्यांमधूनच ग्रीक विचारांचा उगम व विकास झाला.तत्त्वज्ञानाची भूमि समजले जाणारे अथेन्स हे शहर म्हणजे एक नगरराज्यच होते.

ग्रीक - पाश्चात्य तत्त्वज्ञानास किमान दोन हजार वर्षाची परंपरा आहे. वेगवेगळ्या ग्रीक आणि पाश्चात्य-युरोपीय इतिहासकारांनी या तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिला. या इतिहासकारांनी या तत्त्वज्ञानाच्या कालखंडाचे व त्यातील विचारप्रवाहाचे साधारणत: तीन विभाग केले. ते पुढीलप्रमाणे :

1. प्राचीन तत्त्वज्ञान : इ.स.पू.625 ते इ.स. 476
2. मध्ययुगीन तत्त्वज्ञान : इ.स. 476 ते इ.स. 1453
3. अर्वाचीन (आधुनिक) तत्त्वज्ञान : इ.स. 1453 ते विद्यमान काल.

**हेरोडोटस**[2] (इ.स.पू.484 ते 425) हा पहिला ग्रीक इतिहासकार मानला जातो.त्यानेच प्रथम ग्रीक इतिहास लिहिला. त्या आधारे कुशमन[3] या इतिहासकाराने ग्रीक तत्त्वज्ञानाची विभागणी केली.ही विभागणी सर्वमान्य असून ती अशी :

1. विश्वशास्त्रीय तत्त्वज्ञानाचा कालखंड : इ.स.पू. 600 ते इ.स.पू. 450
2. मानवविज्ञान तत्त्वज्ञानाचा कालखंड : इ.स.पू. 450 ते इ.स.पू. 400
3. प्रणालीप्रधान तत्त्वज्ञानाचा कालखंड : इ.स.पू. 400 ते इ.स.पू. 322
4. हेलेनिस्टीक रोमन तत्त्वज्ञानाचा कालखंड : इ.स.पू. 322 ते इ.स.पाचवे शतक

- विश्वशास्त्रीय तत्त्वज्ञान म्हणजे *दृश्य विश्वाविषयीचे आणि विश्वाच्या मूळ कारणाचे तात्त्विक चिंतन .*
- मानवविज्ञान तत्त्वज्ञान म्हणजे *' मानवाविषयीचे तात्त्विक चिंतन'.*
- प्रणालीप्रधान तत्त्वज्ञान म्हणजे *तात्त्विक चिंतनाची सुव्यवस्थित, पध्दतशीर मांडणी झालेले तत्त्वज्ञान.*
- हेलेनिस्टीक रोमन तत्त्वज्ञान म्हणजे *ग्रीक तत्त्वज्ञान व संस्कृतीचा रोमन साम्राज्यावर विधायक परिणाम झाल्यानंतर निर्माण झालेले तत्त्वज्ञान.*

या कालात ग्रीस राष्ट्र अस्तंगत होवून रोमन साम्राज्याचा भाग बनले व मांडलिक बनले.पण ग्रीक संस्कृती व तत्त्वज्ञानाने रोमनांना संस्कृतीचे ज्ञान दिले.असंस्कृत रोमनांना ग्रीकांमुळे सांस्कृतिक चेहरा लाभला.ग्रीकांनी या कालखंडापासून रोमन, पाश्चात्य व युरोपीय संस्कृतीवर कायमचे वैचारिक प्रभुत्व स्थापन केले.

## (1) विश्वशास्त्रीय तत्त्वज्ञान

ग्रीक वसाहतींमध्ये आयोनिया हा नगर राज्यांचा समूह होता.त्यात मायलेटस हे शहर होते. या छोट्या शहरात इ.स.पू.सहाव्या शतकात तत्त्वज्ञानाचा जन्म झाला.तेथील तत्त्ववेत्त्यांना *'आयोनियन'* किंवा *'मायलेशियन तत्त्वज्ञ'* म्हणतात.पहिले तीन प्रमुख मायलेशीयन तत्त्ववेत्ते म्हणजे थेल्स, अनाक्झिमेंडर, अनाक्झिमेनीस

---

[2]शास्त्रीय रितीने इतिहास लिहिणारा हेरोडोटस (**Herodotus** इ.स.पू.480 ते इ.स.पू. 425)हा जगातील पहिला इतिहासकार समजला जातो. त्याची इतिहास लेखनाची पध्दती अत्यंत शिस्तबध्द असल्यामुळे ती आदर्श होती. इतिहास कसा लिहावा, याचा पाया त्याने रचला.म्हणून त्याला ***इतिहासशास्त्राचा जनक*** अथवा **'इतिहासाचा जनक'** म्हंटले जाते. 'The Father of Lies' या शब्दात त्याचा उपहास केला गेला. प्राचीन ग्रीसमधील हेलिकार्नेसस येथे त्याचा जन्म झाला. त्याने *The Researches* or *The Inquiries* हा नऊ खंडांचा मोठा इतिहास लिहिला.

[3]अज्ञात

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

---


होय.या तिघांनी मिळून *‘मायलेशिअन संप्रदाय’* तयार होतो.थेल्स अथवा थेलीस हा त्यातील पहिला तत्त्वज्ञ आहे.या तत्त्ववेत्त्यांचा विचार मुख्यत: विश्वाविषयीचा होता. हे विश्व म्हणजे काय ? ते कसे तयार झाले ? विश्वाला कुणी निर्माता आहे काय ? विश्वाची मूलद्रवे कोणती ? इत्यादी प्रश्नांचा त्यांनी विचार केला.म्हणून त्यांना *विश्वशास्त्रीय तत्ववेत्ते* म्हंटले जाते.



## 1.1) थेलीस (Thales)

थेलीस (ख्रि.पू.624 ते ख्रि पू.550)हा पश्चिमेकडील शास्त्रीय व तात्विक दृष्टीने विचार करणारा मानवजातीतील पहिला महामानव होऊन गेला असे म्हणावयास हरकत नाही. तो विश्वशास्त्र घडविणा-या मायलेशियन संप्रदायाचा आदि-संस्थापक होता. थेलीस व त्याच्यानंतरचे तत्वचिंतकांनी तत्वज्ञानाला एक अगदी नवीन दृष्टी दिली व वळण लावले, यात मुळीच शंका नाही.थेलीसाविषयी सर्वांना फारच आदर वाटतो.त्याच्या कालातील सप्तर्षींमध्ये एक ऋषी (शहाणा मनुष्य) म्हणून त्याची ख्याती आहे.

**Thales of Miletus**
(624 BC –546 BC)
**Aristotle** regarded him as
The First Philosopher in the Greek tradition.
According to **Bertrand Russell** ,
"Western philosophy begins with Thales."
Thales attempted to explain natural
phenomena without reference
to mythology and was tremendously influential
in this respect



थेलीस असामान्य प्रज्ञेचा व मर्मदृष्टीचा विचारवंत होता.ख्रि.पू.585 सालामध्ये जे सूर्यग्रहण झाले त्याचे त्याने अचूक भविष्य वर्तविले होते असे समजले जाते.तो एक अत्यंत श्रेष्ठ प्रतीचा वैज्ञानिक व शास्त्रीय दृष्टीने विचार करणारा पुरुष होता.त्याला बरीच शास्त्रे अवगत होती.त्याचे कोणतेही लिखाण उपलब्ध नाही.मात्र त्याच्यासंबंधी माहिती हेरोडोटसने लिहिलेल्या इतिहासावरुन मिळते.

थेलीसने दोन महत्वाची निरीक्षणे नोंदविली.ती त्याच्या मते विचारांचा केंद्रबिंदू आहेत. त्याच्या मते,-

(1) सर्व वस्तूंचे आदी व मूलद्रव्य जल (आप) आहे व या विश्वातील सर्व वस्तूंची उत्पत्ती,समाप्ती किंवा परिगणन जलातच होत असते.

(2) पृथ्वी ही एका सपाट तबकडीसारखी असून ती पाण्यावर तरंगते आहे.

थेलीसच्या मते ‘जल’ (आप) किंवा पाणी हे या विश्वाचे आदी व मूलद्रव्य असले पाहिजे.या विश्वात ’पाणी’च मुळात अस्तित्वात असले पाहिजे व विश्वातील इतर सर्व पदार्थ पाण्यापासूनच विविध प्रकारची स्थित्यंतरे होत होत निर्माण झाले असले पाहिजेत अशी त्याची धारणा होती. साहजिकच ही पृथ्वीसुध्दा पाण्यापासूनच निर्माण झाली असावी.आणि ती पाण्यावर एखाद्या चेंडूप्रमाणे तरंगत असावी, अशी कल्पना त्याला सुचली असावी.

Department of Philosophy, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

अर्थात 'पाणी' हेच विश्वाचे मूलद्रव्य असावे असे थेलीसाला का वाटले असावे हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे.त्याचे कारण असे असू शकेल की पाणी हे अत्यंत चंचल, अस्थिर व गतिशील असते व त्याच्यात विश्वातील बदल व स्थित्यंतरे घडविण्याचे सामर्थ्य असले पाहिजे.आपण ही साधे निरीक्षण केले तर लक्षात असे येईल की अनेक वस्तूंमध्ये जलांश असतो.तो संपला की त्या वस्तूंचे विघटन होते, तिचा भुगा होतो व ती नष्ट होते. शिवाय पाणी विविध रूपे धारण करते.बर्फ, बाष्प, पावसाचे काळ ढग, पावसावरच अवलंबून असलेली शेती; पर्यायाने मानव व मानवेतर प्राण्यांचे जीवन पाण्यावरच अवलबूंन असते.नदी किनारी मानवी संस्कृतीची वाढ झाली. सारे जीवन व जीवसृष्टी व वनस्पतीसृष्टी सुध्दा पाण्यावरच जगते. त्यामुळे साहजिकच थेलीसला पाणी हेच जीवनाचे, विश्वाचे मूलद्रव्य वाटले असणार !



थेलीसचा हा विचार म्हणजे मानवी जीवनातील तत्त्वज्ञानाचा श्रीगणेशा होता ! मानवी विकासातील तो महत्वाचा टप्पा आहे. आधुनिक विज्ञानाच्या दृष्टिकोनातून याकडे पाहिले असता त्याच्या कल्पना हास्यास्पद वाटतात. थेलीसचे हे पाण्याचे तत्वज्ञान तसे पाहिले तर अगदीच अपरिष्कृत व पोरकट वाटते.पण मग त्याला एवढे महत्व का दिले जाते. अशी शंका येणे स्वाभाविक आहे.

तसे पाहाता जल हे विश्वाचे मूलद्रव्य असले पाहिजे या थेलीसच्या कल्पनेला किंवा उपपत्तीला फारसे महत्व नाही.परंतु '' या विश्वाचे आदिकारण कोणत्या तरी एका स्थिर, नित्य, शाश्वत, अपरिवर्तनीय, अविकारी 'द्रव्यात' असले पाहिजे आणि या जगातील सर्व विशिष्ट, मर्यादित व विकारी पदार्थ त्या एका मूलद्रव्यापासून निर्माण झाले असले पाहिजेत, तो निसर्गातील कोणता तरी पदार्थ असला पाहिजे '' हा विचारच मुळात शास्त्रीय किंवा वैज्ञानिक विचाराचा व दृष्टीचा द्योतक आहे.

थेलीसपूर्व काळात केवळ स्वैरकल्पनाविहार करणा-या व अनिर्बंध पौराणिक कल्पनांवर आधारलेल्या धार्मिक उपपत्ती मांडणा-यांचा गजबजाट होता.या लोकांहून थेलीसाची दृष्टी व विचारसरणी भिन्न होती. त्याने शास्त्रीय (वैज्ञानिक),सप्रमाण दृष्टीचा व पध्दतीचा अवलंब केला होता. पूर्वीप्रमाणे अतिनैसर्गिक व अपार्थिव शक्तींच्या आधारे नैसर्गिक घटनांचे विवरण न करता या घटनांचे नैसर्गिक शक्तींच्या आधाराने, विवरण करण्याचा प्रयत्न केला.

थेलीसने हा विचार करून दोन महत्वाची कामे केली.पहिले असे की निसर्गाच्या वरवरच्या भासमय रुपाचा पडदा भेदून आतील सारस्वरुपाला, मूलतत्वाला जाण्याचा प्रयत्न केला. हा विज्ञानाचा पाया आहे.दुसरे असे की या विचारातील अमूर्त व मूलगामी विचारप्रक्रियेमुळे ते तत्वचिंतनही आहे.म्हणजे विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांची एकत्र नकळत सुरुवात थेलीसने करून दिली.वरच्या बदलत्या नामरुपांच्या मागे न बदलणा-या अमूर्त, नित्य, शाश्वत व अविकारी तत्वाचा शोध घेण्याच्या थेलीसच्या प्रयत्नाला तात्विक दृष्टया फार मोठे महत्व आहे. तत्वचिंतनाचा तो प्रारंभ आहे.


नैसर्गिक व वास्तविक घटकांचा व शक्तींचा आधार घेऊन निसर्गातील विविध घटकांचे काल्पनिक, पौराणिक व मानवकल्पनानिर्मित देवासारख्या शक्तींचा आधार न घेता, शास्त्रशुध्द व वैज्ञानिक पध्दतीने विवरण करण्याचा थेलीसने जो प्रारंभी प्रयत्न केला, त्याने जी समस्या उभी केली व स्पष्टपणे मांडली व तिचे स्वरुप नक्की करुन तिला एक दिशा लावली तिने सॉक्रेटीस-पूर्वकालीन तत्वज्ञानाचा पायाच घातला आहे.नंतरच्या बहुतेक सर्व विचारवंतांनी याच दिशेने प्रयत्न केला. म्हणूनच ग्रीक तत्त्वचिंतनाच्या प्रारंभीच्या काळात तत्वज्ञान व विज्ञान यांचा बेमालूम संगम झालेला पाहावयास मिळतो.

Department of Philosophy, Sangamner college, Sangamner

## 1.2) ॲनॅक्झिमँडर (Anaximander)

थेलीसनंतर विशेष मान्यता पावलेला आयोनियन तत्वतेत्ता म्हणजे ॲनॅक्झिमँडर! त्याचा जन्म सुमारे ख्रि.पू.610 व मृत्यू सुमारे ख्रि.पू.546 मध्ये झाला असावा.तो मायलेटसचा रहिवासी होता व वयाने थेलीसहून बराच लहान असून थेलीसचा शिष्य होता.तत्वज्ञानावर व विज्ञानावर गद्यात ग्रंथरचना करणारा तो पहिलाच ग्रीक विचारवंत,सर्जनशील तत्ववेत्ता होता.खगोल,भूगोल व भूगर्भशास्त्र यात खूपच प्रवीण होता. ॲनॅक्झिमँडर हा जगातील पहिला नकाशाशास्त्रज्ञ होता.





**Anaximander** (610 – c. 546 BC)
He succeeded Thales and became the second master.
He was an early proponent of science and tried to observe and explain different aspects of the universe, with a particular interest in its origins

ॲनॅक्झिमँडर हाही या विश्वाच्या बुडाशी असलेल्या एका अंतिम तत्वाचा किंवा आदिद्रव्याचा शोध घेत होता. थेलीसप्रमाणेच अंतिम द्रव्य हे भौतिक स्वरुपाचे असले पाहिजे असे त्यालाही वाटत असावे. पण ते अंतिम विश्वद्रव्य वायू, जल किंवा अग्नी असेच काही असले पाहिजे असे समजण्याची जरुर नाही असे त्याचे मत होते.त्यापेक्षा या विश्वाच्या किंवा सत्तेच्या बुडाशी असलेले आदिद्रव्य हे ज्यापासून या विश्वातील सर्व वस्तू जन्म घेतात व शेवटी त्या ज्यात विलीन होतात असे अमर्याद, अनंत, आकाररहित, अनिश्चित, गुणरहित व अनिर्धारित असे **'काहीतरी' (Indefinite)** असले पाहिजे असे ॲनॅक्झिमँडरचे मत आहे.

साधारणपणे आपण पाहतो की वस्तूंचे मूलद्रव्य हे कोणत्या तरी विशिष्ट प्रकारचा पदार्थ असते. लाकूड,कापसू,तांबे, पितळ, सोने,पाणी,हवा असा कोणता ना कोणता पदार्थ असते. तसे काहीतरी या विविध प्रकारच्या वस्तूंनी भरलेल्या विश्वामागील तत्त्व असणार पण ते पाणी, हवा असे काही नसाव पण ' काहीतरी ' असणार, असा विचार ॲनॅक्झिमँडर मांडतो. त्याच्या मते जे आदी किंवा मूलद्रव्य आहे ते केवळ 'द्रव्य' (Matter) आहे आणि शिवाय ते वेगवेगळया पदार्थामध्ये विभागले गेलेले आहे. या आदिद्रव्याला स्वत:चा कोणताच विशिष्ट असा गुणधर्म किंवा रंगरुप, आकार असू शकत नाही. कारण ते सर्व पदार्थामध्ये अंतर्हित असते व सर्व पदार्थांत व्यापून राहाते.ते स्वत: निर्गुण व निराकार आहे.ते कोणत्याही गुणाने निर्धारित व मर्यादित होऊ शकत नाही व त्याचे परिणाम अमेय, असीमित किंवा अनंत आहेत.

### 'असीम' *(Boundless)*

ॲनॅक्झिमँडरच्या मते हे द्रव्य अवकाशातून अनंतत्वापर्यंत पसरलेले आहे; याचे कारण असे की ते जर मर्यादित असते तर आतापर्यंत जी अनेक जगे निर्माण झाली व नाश पावली त्यांच्या मोडतोडीत ते आदिद्रव्य संपून गेले असते. म्हणून त्याला तो 'असीम' *(Boundless)* किंवा 'अमर्याद' म्हणतो. शिवाय त्याच्या मते असंख्य जगे निर्माण झाली व अंत पावली. आणि ही जगे शाश्वत किंवा सनातन कधीच नव्हती. असीम, अनिर्धारित व निर्गुण द्रव्यातून ही जगे कशी तयार झाली या बाबतीत ॲनॅक्झिमँडर मतप्रतिपादन करीत नाही असे दिसते.

Department of Philosophy, Sangamner College

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052


अनिर्धारित किंवा निर्गुण द्रव्य एका अज्ञात रीतीने 'उष्ण' व 'शीत' प्रकारात विभागले जाते. 'शीत' हे आर्द्र असते. शीत व आर्द्र द्रव्य हे विश्वाच्या केंद्रस्थानी येवून 'पृथ्वी' बनते. पूर्वी पृथ्वी 'द्रवरुप' होती.पण सभोवतालच्या उष्ण ग्रहांमुळे पृथ्वीच्या पाण्याची वाफ होत जाऊन, तिच्यापासून वायू किंवा हवा बनली व पृथ्वीच्या भोवती पसरुन तिने पृथ्वीस गुंडाळून टाकले.ग्रीक लोक वाफ व हवा (वायू Air) यांना एकच समजत असत. अग्नीच्या प्रभावामुळे ही हवा किंवा वाफ जशी प्रसरण पावली तशी ती बाहेरच्या उष्ण प्रदेशातून फुटून बाहेर पडली आणि त्यातून गाडीच्या चाकासारखी कवचे तयार झाली व त्यांच्यावर दाट व अपारदर्शक अशा वाफेचा घट्ट थर बसल्याने त्यांच्या अंतर्यामी असलेला अग्नी झाकला गेला व दिसेनासा झाला. पण त्यात जी भोके अधूनमधून राहिली त्यातून आपणांस सूर्य व जे प्रकाशाचे ठिपके दिसतात ते चंद्र व तारे होत. ॲनॅक्झिमँडरच्या मते पृथ्वी ही सिलिंडरसारखी लांबट गोल आहे.लोक तिच्या पृष्ठभागावर राहातात.

जिवंत प्राण्यांच्या विषयी ॲनॅक्झिमँडरने एक अद्भूत उपपत्ती मांडली आहे, प्रारंभी पृथ्वी द्रवरुप होती व उष्णतेमुळे त्या द्रव्याचे बाष्पीभवन झाल्याने उष्णता व ओलावा यांपासून जिवंत प्राणी जन्मास आले. सुरुवातीस हे जीव अत्यंत निम्न जातीचे होते. मानव हा प्रारंभी पाण्यात राहणारा मत्स्य होता. नंतर बदलत्या परिस्थितीशी जुळणी करीत असता त्यांच्यात क्रमविकास होत जाऊन जलचर हे जमिनीवर येऊन राहू लागले व ते स्थावर बनले.

ॲनॅक्झिमँडरची परिस्थितीशी जुळणी करण्याची ही कल्पना ॲरिस्टॉटलने पुढे बरीच विकसित केली. त्यांच्या कल्पना जरी काहीशा अपरिष्कृत वाटल्या तरी त्याची दृष्टी मात्र वैज्ञानिक व शास्त्रीय होती. ॲनॅक्झिमँडरचे विचार थेलीसच्या विचारांच्या मानाने अधिक विकसित व उत्क्रांत वाटतात. त्याची निर्गूण, निराकार, अमर्याद व अनिर्धारित द्रव्याची कल्पना तत्वज्ञानाच्या भूमिकेवरुन पाहाता पुष्कळच प्रगत व महत्वाची आहे.शिवाय त्याने प्रत्यक्ष भौतिक परिस्थितीच्या निरीक्षणावर आधारुन आपली तात्विक उपपत्ती बसविली आहे ही एक महत्वाची गोष्ट आहे.

## 1.3) ॲनॅक्झिमेनीस (Aneximens)

मायलेशिअन संप्रदायाचा तिसरा तत्वतेत्ता म्हणजे ॲनॅक्झिमेनीस.हा ॲनॅक्झिमँडरपेक्षा वयाने लहान होता.तो थेलीस व ॲनॅक्झिमँडर यांच्याचसारखा मायलेटसचा रहिवासी होता.त्याचा काल ख्रि.पू.588 ते ख्रि.पू. 524 हा असावा.त्याने गद्यात एक ग्रंथ लिहिला होता. त्याचे बरेच भाग नष्ट झाले पण काही भाग शेवटपर्यंत शिल्लक राहिलेला सापडतो.त्यामुळे त्याच्या विचारांचा अंदाज लावता येतो.

या विश्वाचे मूलतत्व हे 'भौतिक' आहे, या ॲनॅक्झिमँडरच्या मताशी ॲनॅक्झिमेनीस सहमत होता.पण त्याच्या स्वतःच्या मते विश्वाचे आदिद्रव्य किंवा मूलतत्व हे 'वायू' (Air) आहे. 'वायू' हा अवकाशात अमर्यादिपणे सर्वत्र पसरलेला आहे .तो सतत चंचल, अस्थिर व गतिमान असतो व त्याच्या ठिकाणी गती हालचाल निर्माण करण्याचे सामर्थ्य व प्रवृत्ती असते.वायूचे हे स्वरूप लक्षात घेता तिच्या दोन प्रवृत्ती लक्षात येतात.त्या म्हणजे विरलीभवन व घनीभवन होय़ हवा विरल झाली म्हणजे तिचे अग्नीत रुपांतर होते व ती जसजशी अधिकाधिक थंड होते तसतसे क्रमाने तिचे जल, पृथ्वी व पाषाणांत रुपांतर होते.आणि शेवटी पुन: जगाचे मूलवायूत (हवेत) रुपांतर होते, असे ॲनॅक्झिमेनीस म्हणतो. विश्वात असंख्य जगे आहेत व ती सर्व हवेतच राहातात असे ॲनॅक्झिमँडरप्रमाणेच ॲनॅक्झिमेनीसचे मत आहे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

**Anaximenes**
( 585 - 528 BCE)
an Archaic Greek Pre-Socratic philosopher
One of the three Milesian philosophers,
Identified as a younger friend or student
of Anaximander.
Anaximenes, like others in his school
of thought, practiced material monism.





## वायुमय आत्मा

ॲनॅक्झिमेनीसच्या मते माणसाला आत्मा असतो आणि वायुमय आहे. तो जसा आपणांस एकत्र बांधून ठेवतो त्याप्रमाणे हवा व श्वसन यांनी सर्व जग व्यापून राहाते. जग हे आपल्या बाहेर अमर्यादपणे पसरलेल्या वायूचे श्वसन करीत असते असेही त्याचे मत आहे.शिवाय त्याच्या मते पृथ्वी ही एखाद्या तबकडीसारखी सपाट असून जग हे हवेमध्ये झाडाच्या पानाप्रमाणे तरंगते व आकाशातील इतर सर्व पदार्थ - ग्रह व तारे हेही हवेत (वायूत) तरंगत असतात.त्यांच्या कक्षा तिरक्या नाहीत. पण पृथ्वीच जरा कललेली असल्याने ते जेव्हा पृथ्वीच्या उंच बाजूच्या मागे जातात तेव्हा तारे वगैरे आपणांस अदृश्य होतात.त्याच्या मते इंद्रधनुष्य हे सूर्याचे किरण दाट ढगावर पडल्याने दिसते.कारण ते किरण ढगांचा भेद करुन त्यामध्ये प्रवेश करु शकत नाहीत.

ॲनॅक्झिमँडरहून वेगळा होऊन काहीशी थेलीससारखी भूमिका ॲनॅक्झिमेनीस घेतो. एका दृष्टीने त्याचे म्हणणे ॲनॅक्झिमँडरच्या भूमिकेहून अधिक स्पष्ट आहे. कारण निर्गुण निराकार आदिद्रव्यात विभेदन होऊन त्यापासून हे जग कसे तयार होते याविषयी ॲनॅक्झिमँडर याची प्रक्रिया स्पष्टपणे मांडू शकत नाही.त्याचे म्हणणे बरेचसे संदिग्ध व दुर्बोध आहे. उलट जगाच्या निर्मितीस कारण असलेल्या या प्रक्रियांना ॲनॅक्झिमेनीस 'विरलीभवन' व 'घनीभवन' अशी नावे देतो.या जगात जे अनेक प्रकारचे गुणधर्म पाहावयास सापडतात ते मुळात नसून, परिमाणांच्या कमीअधिक प्रमाणातून व त्यांच्या घनत्वातून निर्माण होतात, असा अर्थ घनीभवन व विरलीभवन या पदात अनुस्थूत असावा. घनीभवनामुळे ठराविक आकरारमानात अधिक द्रव्य दाबून भरता येते व विरलीभवनात दाब कमी झाल्याने व्याप किंवा आकारमान वाढते.घनीभवनामुळे जडपणा, टणकपणा आपणांस पाषाणांच्या ठिकाणी पाहावयास मिळतो; उलट विरलीभवनामुळे मऊपणा, हलकेपणा यासारखे गुण व्यक्त होतात.

ही कल्पना कितपत वैज्ञानिक आहे, हा मुद्दा नसून ॲनॅक्झिमेनीस सुध्दा वरील दोघांप्रमाणे वैज्ञानिक विचार पध्दतीनेच विचार करु पाहातो, हे महत्वाचे आहे.त्याची घनीभवन व विरलीभवन याविषयीची कल्पना व या प्रक्रियांच्या साहाय्याने पदार्थांचे गुणधर्म बनण्याची प्रवृत्ती ही गोष्ट निश्चितच शास्त्रीय व तात्विक दृष्टया महत्वाची आहे यात शंका नाही.

### 1.4) ॲनॅक्झॅगोरास (Anaxagoras)

ॲनॅक्झॅगोरासचा जन्म आाशियामध्ये क्लाझोमेनाय येथे इस़. पूर्व 500 च्या सुमारास एका लब्धप्रतिष्ठित घराण्यात झाला होता. त्याने तत्वज्ञान व विज्ञान ही आयोनियातून आट्टिकाला नेली. त्याला लहानपासून विज्ञान व तत्वज्ञान यांच्या अभ्यासाची कमालीची आवड असल्याने त्याने त्याखातर आपली बरीच वडीलोपार्जित मालमत्ता सोडून दिली असे म्हणतात. त्यानेच अथेन्सला तत्वज्ञानाचा परिचय करवून दिला.


Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
------------------------------------------------------------------------------------------



## Anaxagoras

( "lord of the assembly"; 500 – 428 BC)
Pre-Socratic Greek philosopher.
the first philosopher to bring philosophy from Ionia to Athens. He attempted to give a scientific account of eclipses, meteors, rainbows, and the sun




ॲनॅक्झिमँडर व ॲनॅक्झिमेनिस यांचा व त्याचा प्रत्यक्ष संबंध आला होता. त्या वेळचा प्रसिध्द राजकारण-धुरंधर पेरिक्लिस[4] याच्याशीही त्याचा घनिष्ठ संबंध होता.पण त्यामुळे त्याला बराचसा त्रासही भोगावा लागला. त्या काळी तो तरुणांना अधार्मिकतेची शिकवण देतो असा त्याच्यावर आरोप करण्यात आला; त्या खटल्यात त्यास शिक्षा होऊन हद्दपार करण्यात आले व म्हणून तो आशियामायनरच्या आपल्या मूळ मातृभूमीस परत गेला. तेथेच तो वयाच्या 73 व्या वर्षी निधन पावला. त्याचे चारित्र्य निष्कलंक होते व मृत्यूसमयी त्याच्याभोवती त्याचे बरेचसे सुशिक्षित शिष्य होते.

ॲनॅक्झॅगोरासच्या तत्वज्ञानाची मूळ भूमिका एम्पिडोक्लिसच्या तत्वज्ञानासारखीच आहे. सत्तेचे संभवन म्हणजे सत् चे असत् होणे व असत् चे सत् होणे या दोन्ही कल्पना त्याला अमान्य होत्या.मूलद्रव्य हे अनिर्मित व अविनाशी आहे. सर्व संभवन घटक भागांशी संमिश्रण व वियोजन या मार्गांनी होते, ॲनॅक्झॅगोरासचे मत होते. त्याच्या मते काहीही निर्माण होत नाही व काहीही नाश पावत नाही.

## बीजे

ॲनॅक्झॅगोरासच्या मते अनेक स्वतंत्र अंतिम मूलद्रव्ये आहेत, त्यांना तो 'बीजे (Seeds) म्हणतो.पण ही फलबीजे केवळ पृथ्वी, आप,तेज व वायू ही चार महाभूते नाहीत; उलट ही महाभूते यौगिके (Compounds) होत. अणुवाद्यांच्या मते पदार्थांचे अंतिम घटक हे एकाच प्रकारच्या द्रव्यांच्या परमाणूंनी बनलेले आहेत. ॲनॅक्झिमँडरला ही मते मान्य नाहीत. त्याच्या मते द्रव्याचे मूळ प्रकार सम अर्थाने अंतिम व अव्युत्पन्न (Un-derived) आहेत.म्हणजे सोने, हाडे, केस, पृथ्वी, पाणी, लाकूड इत्यादी वस्तू पदार्थांचे अंतिम प्रकार होत; ते इतर कशापासूनही तयार होत नाहीत व त्यांचे एकमेकांत रुपांतरणही होत नाही.

त्याच्या मते अंतिम द्रव्याचे अमर्यादपणे विभाजन[5] करता येते. विश्वाच्या सुरुवातीस हे सर्व पदार्थ दुर्व्यवस्थितपणे (Choaotic) एकमेकांत मिसळलेले होते,अवकाशात अमर्यादपणे वस्तुता (Mass) पसरलेली असते.विविध प्रकारची द्रव्ये ही पूर्णपणे एकमेकांत मिसळून व एकमेकात घुसून गेलेली असतात.सुरुवातीस सर्व पदार्थ संख्येने अमर्याद होते. त्यांची सूक्ष्मताही अपरिमित व आत्यंतिक होती.जेव्हा जगाची उत्पत्ती सुरु झाली

---

[4] **Pericles** ("surrounded by glory"; 495 – 429 BC) a prominent and influential statesman, orator, and general of Athens during the city's Golden Age.

[5]अणुवाद्यांच्या मते पदार्थांचे विभाजन करीत करीत शेवटी अविभाज्य 'परमाणू' प्रत आपण येऊन पोहोचतो.पण हे ॲनॅक्झॅगोरासला मान्य नाही.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052


---

तेव्हा सर्व पदार्थांचे जे एकत्र संमिश्रण झालेले होते. त्यांच्यात विभाजन व अलगपणा सुरु झाला.नंतर सारख्या प्रकारचे पदार्थ एकत्र येऊ लागले. विश्वाला गति व प्रेरणा देणारे चित्तत्व म्हणजे *नाऊस* (Nous) होय.

### *नाऊस* (Nous)

ॲनॅक्झिॅगोरासच्या या 'नाउस' चे स्वरुप कसे आहे हे पाहणे आवश्यक आहे. त्याच्या मते नाऊस हे विश्वाला गति देणारे वैश्विक मन आहे. 'मन' (माइंड) या शब्दाला ग्रीक भाषेत नाऊस असा शब्द आहे.हे वायू, अग्नीसारखे कोणतेही मूलतत्त्व नाही.मात्र मूलतत्त्वांना गति देणारी शक्ती आहे.गति, वाढ आणि परिवर्तन यांची ही बाह्य शक्ती आहे.विश्वारंभी हीच शक्ती विश्वाला गति देते.आधी छोटे भाग गतिमान होतात, हळूहळू मोठे भाग गतिमान होतात.

नाऊस अमर्याद, स्वंयशासित व कशाचेही मिश्रण नसलेले शुध्द विश्वात्म मन आहे.ते सर्व शक्तीमान,परमाणू स्वरूपी व विश्वात्म स्वरूपी असून सर्वज्ञ असते.ते चैतन्यमय असते.ॲनॅक्झॅगोरासच्या मते सर्व पदार्थांना म्हणजे केवळ मनुष्यप्राणीच नव्हे, तर जनावरे, पशुपक्षी, वनस्पती यांना प्राणमय किंवा जीवनशील, चैतन्यपूर्ण बनविणारा नाउस हाच एकमेव आहे.प्राण्यांच्या ज्या वरखालच्या कोटी आहेत त्या सर्वांना जीवनतत्व देणारा व मानवाला सर्वात अधिक प्रमाणात चैतन्य व बुध्दी देणारा नाउस हेच एकमेव बुध्दितत्व आहे.

ॲरिस्टॉटलच्या मते त्याचे हे प्रेरक चित्तत्व (नाउस : Nous) अभौतिक, अशरीरी, अमूर्त म्हणजे चिन्मय आहे.[6] उपनिषदात आत्म्याचे वर्णन केले आहे त्याप्रमाणेच हे चित्तत्व (नाउस) अणूहूनही लहान व महत् पेक्षा व्यापक आहे.ॲनॅक्झॅगोरासने नाऊसची मांडणी करून होमरकालीन थिल्लर देव संकल्पना निकालात काढली.त्या जागी एका गंभीर चेतनतत्त्वाची स्थापना केली.ही नंतरच्या तत्त्ववेत्त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानातील ईश्वर संकल्पनेची पायाभरणी होती.या संकल्पनेच्या आधारेच हळूहळू ईश्वराची स्थापना होत गेली !

## 1.5) एम्पिडोक्लिस (Empedokles, Empedocles)

व्यक्तिमत्व

एम्पिडोक्लिस (ख्रि.पू.495 ते ख्रि.पू.435)हा सिसिली बेटातील अक्रागसचा किंवा ॲग्रिगेन्टसचा रहिवासी होता. एम्पिडोक्लिसला राजपदाचा मान मिळणार असून सुध्दा तो झिडकारुन त्याने अक्रागसच्या लोकांचा छळ करणा-या राजाविरूध्द बंड केले.लोककल्याणाकरिता त्या काळात लोकशाहीचा उपासक म्हणून झगडल्याबद्दल मॅझिनी व गॅरिबाल्डी यांचे शिष्य अजूनही एम्पिडोक्लिसला नितांत आदर दाखवून त्याची पूजा करताना दिसतात.एम्पिडोक्लिसचे कुटुंब राजघराण्यातील असूनही त्याने लोकांबद्दल जे विलक्षण प्रेम दाखविले व स्वत:च्या राजपदाचा व मानाचा त्याग करुनही तो लोकशाहीचा एक खंदा पुरस्कर्ता बनला याबद्दल सिसिलीच्या लोकमानसात त्याला पराकोटीचा आदर दाखविला जातो.

---

[6]त्याचे हे म्हणणे झेलर व अर्डमन यांच्यासारख्या विद्वानांना मान्य आहे. बर्नेटला मात्र 'नाउस' हा भौतिक स्वरुपाचा वाटतो. ॲनॅक्झॅगोरासच्या मते 'नाउस' हा फार सूक्ष्म व अवकाश भरुन राहणारा आहे. तो फार सूक्ष्म आहे.

Department of philosophy, Sangamner college, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
---------------------------------------------------------------------------------------------



**Empedocles**
( 490–430 BC)
Considered as
the last Greek philosopher
to write in verse and the surviving
fragments of his teaching are :
*Purifications* and *On Nature*



एम्पिडोक्लिसच्या काळापर्यंत ग्रीक तत्वज्ञानात बरीच प्रगती झालेली होती व त्यात अनेक परस्परविरोधी तत्वांचा पुरस्कार करण्यात आलेला होता. त्यांच्यात मेळ घालण्याचे व समन्वय घडवून आणण्याचे महान कार्य करावयाची जरुरी होती ते कार्य एम्पिडोक्लिस याने केले.

उदाहरणार्थ पार्मेनायडिसचा सिध्दान्त चिद्वाद्वी किंवा जडवादी दोन्ही रीतींनी मांडता येत होता. पामेनायडिसचा मुख्य मुद्दा होता की सत् हे असत् होऊन शकत नाही, किंवा 'असत,' भावरुप किंवा सत्ता होऊ शकत नाही. जे काही आहे ते सतत तसेच राहाते. तर हिरॅक्लिटसच्या मते विश्वात जसे परिवर्तन किंवा संभवन आहे त्याचप्रमाणे नित्य लोगोसही आहे.ही दोन्ही खरी आहेत.पार्मेनायडिस व हिरॅक्लिटस यांच्या मूळ भूमिकांशी एम्पिडोक्लिस सहमत आहे. तथापि त्यांच्या कल्पना परस्परविरोधी असल्याने त्यांचा समन्वय किंवा ऐक्य दाखविण्याचीही गरज होती. आणि ते महत्वाचे कार्य एम्पिडोक्लिसने केले. त्याच्या मते संकीर्ण वस्तू तयार होतात व नाशही पावतात; त्यांना आदी व अंत दोन्ही असतात. त्या बदलतात परंतु त्या ज्या मूलद्रव्यांच्या परमाणूंपासून बनतात ते परमाणू अविनाशी व अजात असतात.[7]

## चतुर्विध महाभूतांची उपपत्ती

पूर्वीच्या आयोनियन तत्वतेत्यांच्या मते की जगातील सर्व वस्तू एका मूलद्रव्यापासून बनलेल्या आहेत.उदा. थेलीसच्या मते 'जल', ॲनॅक्झिमेनिसच्या मते 'वायू' व हिरॅक्लिटसच्या मते 'अग्नी' आहे.[8] पार्मेनायडिसच्या मते मूलद्रव्य नित्य, स्थिर राहाते, त्यात बदल, स्थित्यंतर किंवा रुपांतर होणे शक्य नसते.

एम्पिडोक्लिसने या बाबतीत कोणतीच एकांगी किंवा अतिरेकी भूमिका न घेता तडजोडीची भूमिका घेतली. त्याने या तत्ववेत्यांच्या मूलद्रव्यांना महाभूताच्या (Elements) स्वरुपात मान्यता दिली.थेलीसचे 'जल' (आप), ॲनॅक्झिमेनिसचा 'वायू' व हिरॅक्लिटसचा अग्नी (तेज) या मूलद्रव्यांना 'महाभूते' (Elements) म्हणून त्याने मान्यता दिली.आणि त्यात स्वत:ची 'पृथ्वी' (Earth) या मूलद्रव्याची किंवा महाभूतांची भर घालून चतुर्विध महाभूतांची उपपत्ती मांडली.म्हणजे एम्पिडोक्लिसच्या मते हे विश्व पृथ्वी, आप, तेज (अग्नी) व वायू या चार महाभूतांपासून बनलेले आहे.या चार मूलद्रव्यांना किंवा महाभूतांना तो *'सर्व गोष्टींची मुळे'* (The Roots of all) असे म्हणतो. या चार महाभूतांचा वेगवेगळया प्रमाणात होणा-या मिश्रणातून जगातील हजारो विविध प्रकारच्या वस्तू बनतात असा त्याचा सिध्दान्त आहे. म्हणजे जगातील सर्व बदल किंवा संभवन हे परमाणूंचे संयोजन

---

[7] हाच विचार पुढे ॲनॅक्झिगोरास व अणुवादी डेमॉक्रिटस यांनी चालविला.

[8] म्हणजे मूळ एका द्रव्यात स्थित्यंतरे व रुपांतरे होऊन त्यापासून विभिन्न वस्तू बनतात. म्हणजे केवळ एकाच 'जला'पासून पितळ, लाकूड, हवा यांसारखे वेगवेगळे पदार्थ बनतात.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
---



(Composition) व विघटन (Decomposition) हेच असते.या नव्या विचारास ग्रीक तत्त्वज्ञानात *संकलनात्मक (Eclectic) तत्वज्ञान* म्हणतात आणि ते मांडणाऱ्या तत्त्ववेत्यांना *संकलनात्मक (Eclectic)*[9] तत्त्वज्ञ.

## महाभूतांची शक्ती

या महाभूतांचे संयोजन व विघटन हे त्यांच्या परमाणूंच्या हालचालींमुळे होते हे खरे. पण त्यांना हलविणारी ही शक्ती किंवा प्रेरणा कोणती आहे हा एक प्रश्नचा आहे. आयोनियन तत्वज्ञान्यांच्या मते ही प्रेरक किंवा हालचाल करण्याची शक्ती मूलद्रव्यांमध्येच अंतर्हित असते. ॲनॅक्झिमेनिसच्या 'वायूत' किंवा थेलीसच्या 'जलात' किंवा हिरॅक्टिलसच्या 'अग्नीत' द्रव्याचे रुपांतरण करण्याची शक्ती अंतर्हित आहे. एम्पिडोक्लिसला ही कल्पना मान्य नाही. तो (द्रव्यांना) महाभूतांना जड व निष्प्राण समजतो; व त्यांत गतिप्रेरक सामर्थ्य नसते असे मानतो.

याचा अर्थ महाभूतांमध्ये हालचाल किंवा गती निर्माण करण्यासाठी जबाबदार असे कारण त्याच्या बाहेर असले पाहिजे. महाभूतांना एकत्र मिसळविणारे व विभक्त करणारे अशा परस्परविरोधी दोन वेगळया शक्ती असल्या पाहिजेत. त्यांना तो स्नेह, प्रेम (Love) आणि घृणा, विग्रह (Hate, Strife) किंवा सुसंवाद (Harmony) व विसंवाद (Discord) अशी नावे देतो. विविध द्रव्यांचे परस्परांमधील आकर्षण विशद करण्यासाठी तो त्याला प्रेम (Love) व त्यांच्या परस्परांपासून दूर जाण्यासाठी काम करणा-या शक्तीस तो घृणा, संघर्ष, विग्रह (Strife) असे नाव देतो. प्रेमामुळे चार मूलद्रव्ये किंवा महाभूते एकमेकांत जणू एक प्रकारच्या द्रावणात मिसळून जातात; व त्या वेळी विग्रह घुसतो तेव्हा प्रेम केंद्रस्थानी गोळा होऊ लागते व चार द्रव्ये एकमेकांपासून वेगळी होतात. प्रेम केंद्रस्थानी राहाते, ते जेव्हा विकसते तेव्हा विग्रहाच्या शक्ती बाहेरच्या दिशेकडे ढगलल्या जातात; म्हणजे जसे भांड्यात हवा असताना प्राणी शिरु शकत नाही तसेच विग्रह असताना प्रेम शिरु शकत नाही किंवा प्रेमाने व्यापलेले असताना विग्रहाचा शिरकाव होत नाही. म्हणजे रक्त व हवा शरीराला असतात तसेच प्रेम व विग्रह जगाला असतात. एम्पिडोक्लिस प्रेम व घृणा किंवा विग्रह हे मानसशास्त्रीय शब्द जरी वापरत असला तरी त्यांचा अभिप्रेत अर्थ मात्र 'भौतिक' आहे.

## 'मंगल ईश्वर'

जगाच्या उत्पत्ती व लय यांविषयी एम्पिडोक्लिसने आवर्त-चक्राची उपपत्ती मांडलेली आहे. जगाची प्रक्रिया ही वर्तुलाकार असून तिला आदी व अंत दोन्ही नाहीत. त्याची चार वलये (Spheres) आहेत. प्राथमिक किंवा मूळ वलयात पृथ्वी, आप, अग्नी व वायू ही चार महाभूते एकमेकांत पूर्णपणे मिसळून गेलेली असतात. पाणी हे वायूपासून किंवा वायू हा पृथ्वीपासून वेगळा झालेला नसतो. म्हणजे वलयातील कोणत्याही भागात ही चार महाभूते समप्रमाणातच पाहावयास मिळतात. त्यांना एकत्र आणणारी व सांभाळणारी शक्ती प्रेम, मैत्री किंवा स्नेह (Love) ही असते. त्यात संपूर्ण मेळ किंवा संवाद असतो. त्या वलयाला तो *'मंगल ईश्वर' (Blessed God)* म्हणतो.

या वलयाच्या सीमेवर सर्वत्र विग्रहाची किंवा घृणेची शक्ती भरुन राहाते. ती जेव्हा परिघाकडून किंवा सीमेकडून केंद्राकडे शिरकाव करु लागते तेव्हा विघटनास सुरुवात होते व महाभूते परस्परांपासून वेगळी होऊन लागतात. त्यामुळे ऐक्य संपुष्टात येऊन विभेद होऊ लागतो व शेवटी सर्व समानधर्मी परमाणू एकत्र येऊन पृथ्वी, आप, अग्नी व वायू ही महाभूते परस्परांपासून पूर्णपणे सुटी व वेगळी होतात. असे घडते तेव्हा विघटनाची प्रक्रिया पूर्ण होते व विग्रहाचे प्राधान्य किंवा सार्वाभौमत्व प्रस्थापित होते.

---
[9] दक्षिण इटलीतील इलिया या नगरातील तत्त्ववेत्त्यांना हे नाव होते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
---------------------------------------------------------------------------------------------

असे होता होता पुन: प्रेम किंवा स्नेहाची शक्ती काम करु लागते व ती महाभूतांचे संमिश्रण किंवा ऐक्य करु लागते व ती पुन: सर्व महाभूते पूर्णपणे एकत्र मिसळवून अभेदाची अवस्था निर्माण करते. अशा रीतीने संयोग-वियोग, संयोजन-विघटनाचा हा खेळ सतत सुरु राहतो. आणि एकाचे जेव्हा दुस-यावर प्रभुत्व किंवा प्राबल्य असते तेव्हा त्याचा आनुषंगिक गुण दृग्गोचर होतो. आपले जग तयार होत असताना प्रथम वेगळे होणारे महाभूत म्हणजे वायू, मग अग्नी व शेवटी पृथ्वी, हे होय.




भारतीय दर्शनातील वैशेषिकांच्या जगताची निर्मितीच्या सिध्दान्ताशी हा विचार जुळतो. वैशेषिकांच्या मते विश्वनिर्मिती अणूंच्या संयोजन व विघटनाने होत असते. या विश्वातील प्रत्येक वस्तूत पृथ्वी, आप, तेज व वायू या चार महाभूतांचे अणू असतात व त्यांचे जसे कमीअधिक प्रमाण असते त्या प्रमाणात त्या वस्तूंचे गुणधर्म तयार होत असतात. जगातील सर्वच वस्तू संकीर्ण असतात व त्यांची घडण या चार महाभूतांच्या अणूंनी त्यांच्या विविध प्रमाणांतील संमिश्रणांनी होत असते.

## 1.1.6) डेमॉक्रिटस

डेमॉक्रिटस थ्रेसमधील अब्डेराचा रहिवासी होता. तो लहान असताना ॲनॅक्झिगोरास वार्धक्यास पोहोचला होता असा उल्लेख सापडतो. त्याला ज्ञानाची फार आवड होती व त्यासाठी त्याने दूरवर खूप प्रवास केले होते. त्याने इजिप्त, बाबिलोनिया, पर्शिया व अथेन्सला भेटी दिल्या होत्या. डेमॉक्रिटसचे मन सर्वस्पर्शी होते. त्याच्या काळातील तत्वज्ञानातील सर्व ज्ञानाचा त्याला जवळून परिचय होता. त्याच्या व्यापक चिंतनशीलतेच्या बाबतीत त्याची ॲरिस्टॉटलशी तुलना होऊ शकेल.

डेमॉक्रिटसने प्रोटॅगोरासच्या विचाराने प्रभावित होऊन मानसिक जीवनाच्या क्षेत्राचा तत्वज्ञानाच्या अभ्यासात समावेश केला ही डेमॉक्रिटसची फार महत्वाची कामगिरी आहे. डेमॉक्रिटस भौतिकवादी होता पण वृत्तीने तो एक महान चिद्वादी होता. त्याने आपले संपूर्ण जीवन संशोधन करण्यात, प्रगल्भ विचारवंत व चिंतन करण्यात घालविले.

**Democrates**
( 460 – 370 BC)
Pythagorean philosopher,
Famous for his moral maxims, called
the *Golden Sentences*



खरे पाहाता ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांनी अणुवाद मांडला. ते दोघेही अणूवादी आहेत. दोघांच्याही मते अंतिम सत्ता ही अजात, अनिर्मित व अविनाशी अशा अणूंची आहे. डेमॉक्रिटसच्या मते या विश्वात निरपेक्ष निर्मिती व निरपेक्ष विनाशी असे काही नसतेच. या विश्वातील सत्तेची जी असंख्य रुपे व जी गतिमानता असत्य, मिथ्या किंवा भासमान नाही. त्याच्या मते पार्मेनायडिस आणि हिरॅक्लिटस या दोघांच्याही भूमिकांत बरेचसे तथ्य आहे. पण त्या एकांगी आहेत. त्यामुळे त्याने स्वत:चे मत मांडले.

*'अणू' (Atom)*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052


---

ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांच्या मते कोणत्याही वस्तूचे व पदार्थांचे विभाजन केले तर शेवटी ज्यांचे पुढे तुकडे किंवा भाग करता येत नाहीत अशा अविभाज्य एकका पर्यंत आपण येऊन पोहोचतो.ते इतके लहान, सूक्ष्म व संख्येने अगणित असतात की ते डोळयांना दिसू शकत नाहीत.ते कोणत्याही वस्तूचे किंवा पदार्थाचे अंतिम घटक अवयव असतात; त्यांना *'अणू' (Atom)* म्हणतात.हा कणवादाचा किंवा अणुवादाचा मूळ सिध्दान्त आहे.

(एम्पिडोक्लिस अंतिम स्वरुपाचे चार पदार्थ आहेत असे मानतो.)'अणुवादी' मात्र फक्त एकच अंतिम मूलद्रव्याचे किंवा पदार्थांचे सर्व अणू असतात असे मानतात. अणूंमध्ये गुणात्मक भेद मुळीच नसतात; त्यांच्यातील सर्व फरक किंवा भेद हे केवळ संख्यात्मक किंवा परिमाणात्मक असतात. ते अणू आकारमानाने लहान-मोठे असे असतात त्यांचे आकारही भिन्न असतात.अंतिम अणूंना स्वत:चे असे गुणधर्म नसतात व म्हणून वस्तूंचे जे प्रत्यक्ष गुणधर्म असतात ते त्यांच्या अणूंच्या रचना अणूंची स्थाने व त्यांचे अभिकल्प यांच्या भेदामुळेच तयार होत असतात. म्हणजे अणूंच्या यांत्रिक रचनेच्या साहाय्याने त्यांच्या गुणधर्मांतील फरकांचे स्पष्टीकरण आधुनिक रसायनशास्त्रात जे दिले जाते त्याचा उगम या अणूवादात सापडतो.

अणूंना सीमा असून ते एकमेकांपासून विभक्त व सुटे असतात व त्यांना एकमेकांपासून सुटे करणारी पोकळी (रिकामा आवकाश - Empty space) असते.अणूंच्या सतत हालचाली होत असतात, आणि अणूंचे संभवन (Becomimg) व वस्तूंचे गुणशीलत्व (Qualitativeness), अणूंचे संमिश्रण व वियोजन , पोकळी मुळे होत असते. अणूवाद्यांच्या मते रिकामा अवकाश (Empty Space) हाच अ-भाव किंवा अ-सत् आहे व या अर्थाने अ-भाव किंवा अ-सत् (Not-being) हे अस्तित्वात असते. या बाबतीत डेमॉक्रिटस म्हणतो, 'सत् हे असत्पेक्षा कशानेही अधिक सत्य असत नाही'. अणू हे गुणविरहित असल्यामुळे ते रिकाम्या अवकाशापासूनचा फरक किंवा भेद होय़ म्हणून अणू व शून्यता (Void) यांना प्लेनम (Plenum) व पोकळी (Vacuum) म्हणतात.

भारतीय तत्वज्ञानात अणुवाद किंवा कणवाद वैशेषिकांनी प्रथम मांडला. त्यांच्या मताप्रमाणेही या विश्वातील सर्व वस्तू अविभाज्य कणांच्या किंवा अणूंच्या संयोजनातून तयार होत असतात. वैशेषिकदर्शनाचा प्रवर्तक ऋषी 'कणाद' होता व तो कण खाऊन राहात होता असे म्हणतात. *'कणं अत्ति इति कणाद:'* अशी त्या शब्दाची व्युत्पत्ती आहे. वैशेषिकांच्या मतेही जे अंतिम सप्त पदार्थ आहेत ते त्यांच्या विशेष गुणधर्मावरुनच ठरलेले आहेत.अंतिमभेद हे 'विशेष' आहेत व हे विशेष अंतिम आहेत असे हे दर्शनकार मानतात.म्हणून त्याला 'वैशेषिक' दर्शन असे म्हणतात.


Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## 1.2.1) पायथागोरस (Pythagoras)

पायथागोरस या व्यक्तीविषयी फारशी निश्‍चित माहिती उपलब्ध नाही. पायथागोरासचा संप्रदाय प्रसिध्द आहे, पण ते सर्व त्याचे शिष्यच होते असे मात्र नाही.खरे म्हणजे ज्यांना पायथागोरियन्स म्हणतात ते स्वतंत्र लोक होते व त्यांचा एक धार्मिक पंथ होता आणि तो दक्षिण इटलीत क्रोटोन या ठिकाणी पायथागोरास नावाच्या सेमियन व्यक्तीने स्थापन केला होता अशी आख्यायिका आहे.

स्वत: पायथागोरस हा एक आयोनियन होता असे म्हणतात. पायथागोरासचे स्वत:चे असे कोणतेच लिखाण उपलब्ध नाही. त्याची तथाकथित जी तीन चरित्रे आहेत ती त्याच्या मृत्यूनंतर शेकडो वर्षांनी लिहिली गेलेली असल्याने त्यांत बराचसा काल्पनिक भाग असावा. त्याच्या जीवनाविषयी बरेचसे अज्ञानच आहे. परंतु त्याचा जन्म ख्रि. पू. 580 व 570 या दरम्यान केव्हातरी झाला असावा असे दिसते. त्याच्या मध्यम वयात तो इटलीमध्ये गेला असावा. तो मुळात सेमियन होता. परंतु पोलिक्रेट्स या क्रूर राजाच्या कारकिर्दीला कंटाळून तो सामोस सोडून आपल्या देशातून परागंदा झाला असावा.

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
---



**Pythagoras**
(570 – 495 BC )
Ionian Greek philosopher,
mathematician,
founder of the religious movement called Pythagoreanism.



पायथागोरास हा धार्मिक व सामाजिक सुधारणांचा प्रणेता होता व त्यासाठी त्याने एक पंथ प्रस्थापित केला होता.त्यात त्याने निवृत्तिपर जीवनावर वैज्ञानिक विचारसरणीवर भर दिला होता.पायथागोरासचे व्यक्तिमत्व जसे मनोरंजक तसेच गोंधळात टाकणारेही आहे. त्याने जो धर्मपंथ स्थापन केला त्याची मुख्य तत्वे आत्म्याचा संसार (जन्मजन्मांतरीची परिक्रमणा) मानणे व द्विदलधान्य खाणे पापकारक आहे अशी आहेत. त्याने अत्यंत हास्यास्पद असे 15 निषेध-नियम तयार केले होते. उदा, द्विदलधान्ये खाता कामा नये, खाली पडलेली वस्तू उचलता कामा नये, पांढ-या कोंबडयास स्पर्श करु नये, विस्तव लोखंडाच्या कांबेने चाळवू नये, पावभागावर बसू नये, राजपथावर चालू नये, झोपून उठल्यावर अंथरुणातील कपडे गुंडाळून ठेवावे इ. हे नियम असंस्कृत समाजातील निषिध्दतेच्या कल्पनेचे द्योतक आहेत.

आत्मा ही अमर वस्तू आहे तिचे इतर जिवंत वस्तूंमध्ये रुपांतर झालेले आहे; एकदा जे अस्तित्वात येते ते जन्ममृत्यूच्या चक्रात पुन: जन्माला येत असते आणि जगात संपूर्णपणे नवे असे काहीच नसते व ज्या ज्या वस्तूंमध्ये चैतन्य (जीवन) असते त्यांना आपल्याच जातीचे समजावे अशी पायथागोरासची शिकवण आहे.

पायथागोरासच्या तात्विक भूमिकेसंबंधी त्याचे स्वत:चे अमुक एक तत्वज्ञान आहे असे मानणे बरोबर ठरणार नाही. त्याने स्वत: नेमके कोणते विचार मांडले आहेत व कोणती भर तत्वज्ञानात घातली आहे हे निश्चितपणे माहीत नाही. पण तो स्वत: व त्याचे शिष्य व अनुयायी यांनी सर्वांनी मिळून जे तत्वज्ञान मांडले ते स्थूलमानाने खालीलप्रमाणे सांगता येईल:

या जगातील वस्तूंना आपण त्यांच्या गुणधर्मावरुन ओळखतो. या गुणधर्मापैकी बहुसंख्य गुणधर्म हे विशिष्ट स्वरुपाचेच असतात. ते सार्वदेशिक (Universal) नसतात. त्यांपैकी काही गुणधर्म काही वस्तूंच्या ठिकाणी असतात व इतर काही इतर वस्तूंच्या ठिकाणी असतात. उदा, झाडाचे पान हिरवे असते, पण सर्वच झाडांची पाने हिरवी नसतात.काही पिवळी, लाल इत्यादि वेगवेगळया रंगांची असतात.काहींना रंग असा नसतोही. हीच गोष्ट रुची, वास यांच्याहि बाबतीत असते. काहींची चव गोड, तर काहींची आंबट, तुरट, कडू, असते.मग आपल्या विविध पंचज्ञानेंद्रियांना प्रतीत होणा-या गुणधर्मापैकी कोणताही विशिष्ट गुणधर्म सार्वदेश्किक, सर्वामध्ये बसणारा असा नसतो.

पण असा एक मात्र गुणधर्म आहे की जो या विश्वातील सर्व वस्तूंमध्ये अपरिहार्यपणे पाहावयास सापडतो. त्याला मर्यादा पडत नाहीत.तो जड व अजड, स्थूल व सूक्ष्म सर्व प्रकारच्या वस्तूत पाहावयास सापडतो. आणि तो म्हणजे वस्तू संख्येय (Numerable) व गणनीय (Countable) असतात.ज्या विश्वात संख्या किंवा आकडाच नाही अशा विश्वाची कल्पनाच करता येत नाही. पुढे जाऊन असेही म्हणता येईल: एखाद्या वेळी ज्या

Department of Philosophy Sangamner College Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052


विश्वात रंग, गंध, नाद, रुची यासारखे गुणधर्म नाहीत अशा विश्वाची कल्पना करता येईल, पण ज्या विश्वात आकडा किंवा संख्याच नाही असे विश्व अकल्पनीय आहे. म्हणजे संख्या किंवा अंक (आकडा) हा जगातील अत्यंत महत्वाची वस्तू किंवा गुणधर्म आहे, व या विश्वाच्या रचनेत त्याला मूलभूत स्थान आहे. या विश्वात ज्याचे गणन करता येत नाही, ज्याचे मोजमाप करता येत नाही, जे भेद्य नाही, जे 'इतके-तितके' आहे असे म्हणता येत नाही असे काही असूच शकत नाही.

पायथागोरासने केवळ व्यावहारिक व व्यापारी उपयोगापुरता गणिताचा अभ्यास मर्यादित न ठेवता त्यापलीकडे जाऊन त्याने 'शुध्द गणिता' चा पाया घातला.

## संख्या

'संख्या' वस्तूंचे मूलतत्व आहेत व त्या वस्तूंची आकारिक व संबंधविषयक रचना ठरवितात, असा पायथागोरासच्या अनुयायांचा दृष्टिकोन आहे. प्रत्यक्ष भौतिक वस्तू या संख्यांच्या प्रतिकृती किंवा प्रतिमा होत; म्हणजे पुढे प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या तत्वमीमांसेत 'आकार' व 'आशय' यात जो भेद दाखविला गेलेला आहे त्याचे पूर्वचिंतन पायथागोरास याने आधीच केलेले असावे, म्हणजे मग संख्या किंवा आकडे हे जर पदार्थांचे सार असेल तर संख्येविषयी जे काही खरे असेल तर ते वस्तूंच्या विषयीही खरे असेल.

भौतिक जड सृष्टी हीसुध्दा संख्यात्मक आहे व ती 'एकक' (Unit) या मूळ संकल्पनेवर आधारलेली आहे. सर्वात मूलभूत कल्पना फक्त एकाची आहे व सर्व अनेकत्वाच्या व विविधतेच्या कल्पना तितक्याच वेगवेगळया संबंधांवरुन तयार झालेल्या आहेत असे म्हणता येईल. बिन्दू (Point) हा एक (1) आहे व रेषा दोन (2) आहे, आकृती (Figure) तीन (3) आहे व घनपदार्थ चार (4) आहे. पृथ्वी हा घन (Cube) आहे. अग्नी चतु:पृष्ठक (Tetraedron), वायू (हवा) अष्टपृष्ठक (Octohedron) आहे वगैरे. याचा अर्थ पायथागोरासपंथी विचारवंत हे वस्तूंच्या रेषा व पृष्ठभाग हयांना स्वतंत्र अस्तित्व असलेल्या वस्तू समजत असत. कारण रेषा व पृष्ठभाग यांच्याशिवाय वस्तू, पदार्थ (Bodies) असू शकतात, पण पदार्थाशिवायही रेषा व पृष्ठभाग यांची कल्पना करता येते. अवकाश (दिक) आकार हे पदार्थांची कारणे असतात व हे आकर संख्यांनी व्यक्त करता येतात; म्हणून संख्या ह्याच अंतिम कारणे असतात. अशा रीतीने अंकगणितातील भेद भौतिक सृष्टीत खरे म्हणून समजले जातात.

ज्ञानेंद्रियांना प्रतीत होणा-या सर्व वस्तू व घटना या अस्थिर व सतत बदलणा-या असतात. या सर्व परिवर्तनात न बदलणारे, स्थिर, नित्य व शाश्वत जर काही असेल, बदलात जर काही टिकून राहात असेल, काळाच्या ओघोबरोबरच वाहून न जाता किंवा बाधित न होता जर काही अबाधित राहात असेल तर अशा ज्या शाश्वत सद्ववस्तूचा तत्वज्ञानी शोध करीत आहेत ती सद्वस्तू 'संख्या' (Number) असली पाहिजे अशी पायथागोरिअन्सची धारणा आहे. त्यांच्या मते या प्रतिक्षणी बदलणा-या जगताच्या प्रवाहात फक्त संख्या (विशिष्ट आकार) या शाश्वत, अनादी, अविनाशी, अपरिवर्तनीय व स्थिर अशा असतात.[10]

[10] स्थिर, शाश्वत व अविकारी अशी काहीतरी अंतिम सत्ता आहे, असे सत्तत्व ईलियाटिक तत्वज्ञ गृहीत धरतात. त्या विरोधी परिवर्तनाचे तत्त्व हिरॅक्लिटस मांडतो. त्याला विरोधी शक्तींचा जो तालबध्द समतोल अभिप्रेत आहे तो जणू ह्या संख्येच्या रुपाने लाभतो. गणितीसंबंध व विशेषतः संख्यांच्या रुपाने जणू परिवर्तनशील व अस्थिर जगात न बदलणारे सारतत्व पायथागोरियन्सकडून हेरॅक्लिटसला मिळाले.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---



## संख्येची संकल्पना

पायथागोरियन्सच्या मते संख्येची संकल्पना स्थूलपणे खालीलप्रमाणे आहे. सर्व संख्या या मूळ एककापासून (Unit) तयार होतात. एक ही अविभाज्य (Prime) संख्या किंवा अंक आहे; व इतर सर्व म्हणजे केवळ 'इतके' एकक होत. म्हणजे विश्वातील वस्तूंच्या क्रमात एकक हा सर्वप्रथम येतो. संख्यांची (अंक) विभागणी 'विषम' (Odd) सम (Even) याप्रमाणे केली जाते. पायथागोरियन्सच्या मताप्रमाणे या विश्वाची घडण विरोधी व व्याघाती जोडयांनी झालेली आहे, व हे जे विरोधी आहेत त्यांचे मूललक्षण 'विषम' व 'सम' असणे हे आहे; 'विषम' व 'सम' हे अनुक्रमे 'सीमित' व 'असीमित' यांच्याशी एकरुप आहेत.[11] सम अंकाला दोनाने विभागता येते व म्हणून त्याच्या द्विभाजनाला सीमा घालता येत नाही. म्हणून त्याला असीमित समजतात. उलट 'विषम' अंकाला दोनाने विभागता येत नाही व म्हणून त्याच्या द्विभाजनाला मर्यादा पडते. म्हणून त्याला 'सीमित' समजण्यात येत असावे.

अशा रीतीने 'सीमित' व 'असीमित' हे या विश्वाची अंतिम तत्वे ठरतात. म्हणून 'सीमित' किंवा 'सीमा' ही 'एकक' शी एकरुप समजली जाते व या विश्वाचा जो केंद्रवर्ती अग्नी आहे तो हा एककच आहे असेही मानले जाते् म्हणजे आधी 'सीमा' किंवा (सीमामिती Limit) तयार होते व ती 'असीमिता' चा अधिकाधिक भाग स्वत:कडे ओढत असते व त्याला मर्यादा घालीत असते. जेव्हा असीमित सीमित होते तेव्हा ते निश्चित रीतीने 'अमुक एक' पदार्थ बनते; व अशा रीतीने सीमितामुळे असीमितामधून विशिष्ट पदार्थ बनून, हे जग तयार होत राहाते. ज्या दहा विरोधी जोड्यांनी हे विश्व बनले आहे त्या जोड्या पायथागोरियन्सच्या मते पुढीलप्रमाणे :

(1) सीमित व असीमित (2) विषम व सम (3) एक व अनेक
(4) दक्षिण (उजवा) व वाम (डावा) (5) पुल्लिंग व स्त्रीलिंग (6) स्थैर्य (विराम) व गती
(7) सरल व वक्र (8) प्रकाश व अंधार (9) शिव व दुरित
(10) चौरस व आयत.

यानंतर या सिध्दान्तात भर घालण्यात आली. त्यांनी पायथागोरियन्सनी वस्तूंना संख्यात्म (अंकात्मक) रुप दिले. 1 हा बिन्दू होय; 2 रेषा होय; 3 प्रतल होय; 4 घनपदार्थ; 5 भौतिक गुणधर्म; 6 सजीवता (प्राणमयता); 7 बुध्दि, आरोग्य, प्रेम, शहाणपण वगैरे.

अर्थात असे ठरविण्यामागे कोणतेही तत्व होते असे दिसत नाही. कोणत्या वस्तूसाठी कोणती संख्या नक्की करावी याविषयी त्यांचे आपसातच मतभेद दिसतात. उदा, न्यायाचा (Justice) अंक म्हणजे समानास समान परत देतो तो. म्हणजे उदाहरणार्थ मी जर एखाद्यास इजा केली तर त्यानेही मला इजा करावी ! जशास तसे-समानास-समान हा अर्थ न्यायात येता. म्हणून न्यायासाठी असा अंक असावा की ज्यात 'समानास समान' मिळावा. हे ज्यात घडते त्या संख्या 'वर्ग संख्या' होत. उदा, 4 = 2 x 2. यात 'समानास समान' , जशास तसा परत मिळाला. पण मग असे नवाच्याही बाबतीत म्हणता येईल. कारण 9 = 3 x 3 ! त्यामुळे 'न्याय' या वस्तूला नेमका कोणता आकडा (अंक) बहाल करावा हा प्रश्नच राहातो. साहजिकच अशी भर निव्वळ काल्पनिक व यादृच्छिक दिसते.

---

[11] यांना एकरुप कसे समजले गेले कोणास ठाऊक पण त्याचा द्विभाजनाच्या उपपत्तीशी संबंध आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
-----------------------------------------------------------------------------------------------



## 1.2.2) हेरॅक्लिटस (Heraclitus : Herakleitos)

झिनोफेनीस[12] (इ.स.पू.576 - ) या तत्त्वज्ञानंतर झालेला महत्वाचा तत्त्वज्ञ म्हणजे हेरॅक्लिटस होय. ईलियाटिक संप्रदायाचे प्रणेते झीनो[13] (इ.स.पू.489 ते 430) व पार्मेनायडिस (इ.स.पू.541ते इ.स.पू.470) यांचा हिरॉक्लिटस समकालीन होता. झीनोपेक्षा तो वयाने मोठा होता.आशियामायनरमधील एफेसस या गावाचा तो रहिवासी होता.त्याचा जन्म राजघराण्यात झालेला होता. त्याला राजपदही मिळणार होते; परंतु त्याचा त्याग करुन ते त्याने आपल्या भावाला दिले.

हिरॅक्लिटसची लेखनशैली काहीशी क्लिष्ट व दुर्बोध आहे. तो 'दुर्बोध' व 'गूढ' (Dark) या उपनावाने प्रसिध्द आहे.त्याची दुर्बोधता ही सहेतुक होती असे म्हणतात. पण ते तितकेसे खरे नाही.हे मात्र खरे आहे की जसा तो आपले विचार सुस्पष्ट करण्याची तसदी घेत नाही तसाच तो लपवीतही नाही.तो मूर्खांकरिता लिहित नाही. आपल्याा वाचकांना आपले लिखाण समजले तर ठीकच, नाही समजले तर त्यांचे दुर्दैव, अशी एकूण त्याची वृत्ती दिसते ! आपले विचार विस्ताराने मांडून स्पष्ट करण्याची तसदी तो घेत नाही.आपल्या मूळ विचारांना तो अत्यंत अर्थपूर्ण रीतीने पण दुर्बोध, क्लिष्ट पण सारपूर्ण रीतीने व सूत्ररुपाने मांडतो, असे दिसते.जनसामान्यांबद्दल त्याच्या मनात फारसा आदर नव्हता. तो बराचसा निराशावादी होता.त्यामुळे हिरॅक्लिटसला ***'रडका तत्त्ववेत्ता '*** **(Weeping Philosopher)** म्हणतात !

### लोगोस : परिवर्तन हेच सत्य

या दृश्य विश्वाचा अर्थ काय आहे ? मूलतत्त्व एक आहे की अनेक ? परिवर्तन सत्य की नित्यता सत्य ? म्हणजे परिवर्तन विरूध्द नित्यत्व या संघर्षाचे स्वरूप काय आहे ? या तत्कालिन सर्व तत्त्ववेत्त्यांप्रमाणे हिरॅक्लिटसपुढील समस्या होत्या. यावर त्याने दिलेले उत्तर म्हणजे 'लोगोस' *(logos)*[14] हे तत्त्व होय. हिरॉकि्लटसच्या मते ' या विश्वात एक सुव्यवस्थितपणाचे तत्त्व असून तेच विश्वाचे नियंत्रक तत्त्व आहे.तेच लोगोस होय.जगात परिवर्तन आहे आणि परिवर्तन हेच नित्य व सत्य आहे ! प्रत्येक क्षणी परिवर्तन घडत असते.ते अखंड, नित्य व सत्य आहे.

निसर्ग, जगत किंवा नैसर्गिक विश्व म्हणजे गती व परिवर्तन यांचे सतत चालणारे चक्र आहे. विश्व गतीमान आहे.नित्य म्हणजे स्थिर अपरिवर्तनीय काहीतरी आणि परिवर्तन म्हणजे नित्य नसणारे काहीतरी. हिराकि्लटसच्या मते परिवर्तन हेच नित्य आहे.परिवर्तन ज्यामुळे घडत राहाते,ज्यामुळे परिवर्तनाची नित्यता स्थिर राहते ते तत्त्व म्हणजे *लोगोस*[15] होय. लोगोस हे या विश्वातील केंद्रवर्ती चैतन्य तत्त्व आहे.विश्व भौतिक आहे पण त्यामागील तत्त्व मात्र चैतन्यमय आहे, असे तो म्हणतो.

Department of Philosophy Sangamner College Sangamner

---

[12]दक्षिण इटलीमध्ये पूर्वी ईलिया नावाचे शहर होते.तेथे झेनोफेनीसने ईलियाटिक संप्रदाय स्थापन केला असे म्हणतात. हा ॲनाक्झिमेन्डरचा शिष्य होता.तत्कालिन धर्म आणि तत्त्वज्ञान यातील सीमारेषा यानेच आखली.खऱ्या धर्मासाठी त्याने कर्मकांडावर खरपूस टीका केली.

[13]झीनोने तार्किक युक्तिवादातील अनेक विरोधाभासांची उकल केली. त्यापैकी एक प्रसिध्द युक्तिवाद म्हणजे ॲक्लिीस हा ससा आणि कासव यांची शर्यत लागल्यास कोण जिंकेल ? बहुतेक लोककथांमध्ये ही कथा झिरपत गेली.

[14]Logic हा इंग्रजीतील शब्द लोगोस पासूनच बनतो. logy हा प्रत्यय लागून नंतर Psychology सायकॉलॉजी, Zoology झूलॉजी, Sociology सोशॅलॉजी अशा ज्ञानशाखांची नावे दिली गेली. *logos* ही इतकी आशयसमृध्द संकल्पना आहे की नंतरच्या ग्रीक व पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ही संकल्पना पायाभूत महत्वाची ठरली.

[15]या लोगोसशी जुळणारी 'ऋत ' ही संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानात मांडलेली आहे.

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
---------------------------------------------------------------------------------------------



या सर्वाचे ज्ञान कसे होते ? तर परिवर्तनाचे ज्ञान माणसाला ज्ञानेंद्रियांनी होते.पण लोगोसचे ज्ञान मात्र मानवी प्रज्ञेलाच होते.प्रज्ञा हाच लोगोसच्या ज्ञानाचा मार्ग आहे.ते बुध्दिगम्य तत्त्व आहे.तो विश्वाचा नियम आहे.विश्वात सत्य काही असेल तर ते हेच आहे की विश्व गतीमान आहे,परिवर्तनशील आहे आणि त्यामागे लोगोस हे चेतनातत्त्व आहे.

थोडक्यात भौतिक वास्तवरूपी सत्ता परिवर्तनीय असून त्याचा आधार असणारी चेतनसत्ता नित्य आहे.विश्वातील परिवर्तन स्पष्ट करताना तो म्हणतो,

*"एकाच नदीत आपण दोनदा पाऊल टाकू शकत नाही "*

*"आपण आहोत आणि नाही आहोत "*

*" दृश्य विश्व कुणीही मानवाने अथवा ईश्वराने निर्माण केलेले नाही. ते पूर्वीपासून आहे आणि राहणार आहे. ते परिवर्तनशील आहे. "*

त्याचे म्हणणे असे की 'आपण वाहत्या नदीच्या त्याच पाण्यात दोनदा पाऊल ठेवू शकत नाही. पाऊल एकदा उचलून पुन: पाण्यात ठेवताना तेथील पाणी आधीच खाली वाहून गेलेले असते. ती नदी पुढे सरकलेल असते, नवे पाणी आलेले असते आणि असे सतत घडत असते, म्हणूनच त्या पाण्याला नदी म्हंटलेले आहे ! तसेच विश्वाचे आहे.ते सतत बदलते, म्हणूनच ते विश्व आहे.

प्रत्येक गोष्टीला जन्म आणि मृत्यू,उदय व अस्त असतो.प्रत्येक गोष्टीचे स्वरुप सतत बदलत राहाते.हे जग किंवा सत्ता केवळ क्षणजीवी, क्षणभंगूर असते.समुद्राच्या पाण्यावर झेपावणारी लाट ही जरी एकच दिसत व वाटत असली तरी प्रत्येक क्षणाला तिचे पाणी मात्र बदलत असते, वरुन दिसणारा तिचा आकार मात्र तोच राहातो. या जगातील सर्व वस्तू किंबहुना सत्ता ही प्रवाही-सतत बदलणारी परिवर्तनशील आहे.म्हणजे दररोज उगवणारा सूर्य हा देखील-तोच नसतो. दररोज उगवणारा व तळपणारा सूर्य हा प्रतिदिनी व प्रतिक्षणी वेगळाच असतो.तो सतत जळत असतो.समुद्राच्या पाण्याने तयार होणारी नवीन वाफ सतत त्यात येत असते.

## संभवन : सातत्य

प्रत्येक क्षणी वस्तू बदलते व म्हटले तर होती तशी राहाते,त्याचवेळी तिच्यात बदलही होतो.म्हणजे ती स्वत:सारखी असते व नसतेही. म्हणजे एकाच वेळी ती असतेही व नसतेही, तिच्यात एकत्व असते व नसतेही. ह्याचाच अर्थ तिचे संभवन *(Becoming)* होत असते; ती सतत *होत* राहाते.एखादी ज्योत एकच एक, स्थिर, तीच वाटते पण कोणतेही दोन क्षण ती तशी नसते. प्रत्येक क्षणाला तिचे नित्य नूतनीकरण होत असते. तिच्यातील इन्धनाचे क्षण प्रतिक्षणी जळून त्यांची रक्षा होते व नवनवे इन्धनकण त्यांची जागा घेऊन जळत राहातात व प्रकाश निर्माण करीत असतात, प्रदीप्त होत असतात.

## सातत्य

याचा अर्थ असा की प्रतिक्षणी वस्तुत सातत्य (Continuity) राहाते, पण तिच्यात तोचपणा, अभेद, तादात्म्य किंवा अनन्यता (Identity) नसते.बदल व स्थिरत्व (परिवर्तन व नित्यत्व) ही दोन्हीही समान रीतीने सत्य असतात, कारण दोन्ही एकरुप व एकच असतात, त्यांच्यात अभेद असतो. जे जे होते किंवा जे घडत (Becoming) असते त्याला आदी व अंत असतो. मनुष्य जन्माला येतो व मरतो आणि त्याच्या जन्म व मृत्यूच्या दोन अवस्थांच्या दरम्यान त्याच्यात बदल होतात; तो वाढतो, प्रौढ व वृध्द बनतो, शहाणा किंवा मूर्ख बनतो, त्याचे केस पिकतात.झाडाचे पानही काही नुसते फुटते व गळते असे नाही.त्याचा आकार व रंग बदलत जातो.ते

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

आधी तांबूस किंवा पांढुरके असते, मग फिकट हिरव्या रंगाचे, त्यानंतर गर्द हिरव्या रंगाचे बनते व हळूहळू पिवळसर होऊन ते शेवटी पिकते व वाळते.पानाचे हिरव्याचे पिवळे होणे हा त्याचा रोगच म्हणावयाचा.म्हणजे वस्तू जन्माला किंवा अस्तित्वात येणे म्हणजे अभावाने (Not-Being) भावात किंवा अस्तित्वात येणे; तसेच रोग होणे म्हणजे भाव किंवा अस्तित्व याने अभावात किंवा अनस्तित्वात जाणे.ही प्रक्रिया म्हणजेच *संभवन* होय.

थोडक्यात, संभवनात किंवा परिवर्तनात (Becoming) भाव व अभाव हे दोन्ही असतात, पण त्याचा अर्थ एवढाच की एक भाव दुस-या भावात रुपांतरित होतो.पण हिरॅक्लिटसच्या मते हे रुपांतरण म्हणजे असे नव्हे की एका क्षणाला भाव असतो व दुस-या क्षणाला अभाव होतो.याचा अर्थ त्याच्या दृष्टीने एवढाच आहे की प्रत्येक गोष्टीत एकाच वेळी भाव (Being) व अभाव (Not-Being) दोन्हीही असतात.भाव हा अभावात असतो.भावात अभाव असतो.

## एकत्व व अनेकत्व

सत्ता हिरॅक्लिटसच्या मते एकच असते, पण त्याचबरोबर ती अनेकही असते, आणि तिचे अनेकत्व हे केवळ यादृच्छिक नसून, ते तिच्या सारस्वरुपातच असते.म्हणजे एका सत्तेच्या अस्तित्वाला ते एकाच वेळी एक व अनेक असणे हे अत्यावश्यक असते.म्हणजे अनेकतत्वात व विविधतेत एकता वसत असते, किंवा *'अविभक्तं विभक्तेषु'* असे एकच अंतिम विश्वसत्य आहे.म्हणजे हिरॅक्लिटसची कल्पना 'मूर्त सामान्याची' म्हणजे अनेकात वसणारे एक किंवा भेदात वसणारा अभेद अशी आहे. अनेक हे कदाचित अभिव्यक्ती आहेत. पण अनेकात वसणारे हे एक आहे तरी काय ?

## अग्नी : अंतिम तत्त्व

हिरॅक्लिटसच्या मते सर्व गोष्टींचे सार 'अग्नी' (Fire)[16] आहे.हे जग ईश्वराने किंवा मानवजातीने घडविले नसून, ते शाश्वत अशा अग्नीपासून निर्माण झालेले आहे.सर्व वस्तू अग्नीपासून तयार झाल्या आहेत व सर्वांची समाप्ती शेवटी अग्नीतच होत असते.ज्याप्रमाणे सोन्यापासून अलंकार घडतात व अलंकार वितळविले म्हणजे पुन: सोनेच होते त्याप्रमाणे या जगातील सर्व गोष्टी अग्नीपासून निर्माण होतात व त्यांचा लयही अग्नीतच होतो. म्हणजे विश्वाचे अंतिम उपादान कारण अग्नी हाच आहे व बाकी सर्व त्याची विविध मूर्त रुपे आहेत.

हिरॅक्लिटस असे का म्हणतो ? ते असे की अग्नी हा सर्वात अधिक बदलणारा पदार्थ आहे.आपल्या अनुभवावरुन असे दिसते की अग्नी हा विविध विजातीय स्वरुपाच्या वस्तू जळण म्हणून स्वत:मध्ये सामावून घेतो, व त्यांचे भक्षण व रुपांतरण करुन जगत व वाढत असतो. स्वत:हून भिन्न अशा इतर कितीही वस्तू असल्या तरी तो त्यांचे स्वत:मध्ये रुपांतर करुन घेतो, व अशा भिन्न वस्तू जर त्याला भक्षायला मिळाल्याच नाहीत तर तो विझून जातो, नाहीसा होतो.तो प्रतिक्षणी इतका बदलत असतो की प्रत्येक क्षणाला तो वेगळे रुप धारण करीत असतो.तो प्रत्येक क्षणाला इतर पदार्थ बाहेरुन स्वत:मध्ये घेत असतो व तेवढ्याच प्रमाणात तो धूर, राख किंवा वाफ यांच्या मार्गे पदार्थ बाहेरही टाकीत असतो.

विश्वातील मूळ अग्नी हा हिरॅक्लिटसच्या मताप्रमाणे वायूत रुपांतरित होतो, वायू जलात व जल पृथ्वीत रुपांतरित होत असते हयाला तो *'अधोगामी मार्ग'* (Down-ward Path) म्हणतो.याच्या उलट *'उर्ध्वगामी मार्ग'* (Upward Path) आहे व तो म्हणजे पृथ्वीचे जलात, जलाचे वायूत व वायूचे अग्नीत रुपांतर होते. ही सर्व

---

[16]त्याची ही कल्पना काहीशी जुन्या आयोनियन तत्वज्ञांच्या कल्पनेसारखी आहे.उदाहरणार्थ थेलीस अंतिम सत्ता ही 'आप' किंवा 'जल' आहे व ॲनॅक्झिमेनीस 'वायू' आहे असे मानतो.तर ती अंतिम सत्ता 'अग्नी'आहे, असे हिरॅक्लिटस म्हणतो.नंतरच्या स्टोईकांनी हाच विचार मांडला.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---



रुपांतरणे एका विशिष्ट पध्दतीने व क्रमाने होतात व म्हणून हिरॅक्लिटस म्हणतो की अधोगामी व ऊर्ध्वगामी हे उभय मार्ग एकच होत.

अग्नीचे अस्तित्वच मुळी संघर्ष किंवा विरोधी द्वंद्वावर (Strife) व ताणावर (Tension) आधारलेले असते.असे जल किंवा वायूच्या बाबतीत घडत नाही.हिरॅक्लिटस म्हणतो: अग्नी हा उणीव (Want) व अधिक्य (अतिरेक Surfeit) दोन्ही आहे.अग्नी हा सतत विविध प्रकारचे ताण (Tension), विरोधी द्वंद्व, संघर्ष (Strife), भक्षण (Consuming), उद्दीपन (Kindling) व बहिर्गमन या क्रियांनी व्यक्त होत असतो.


## ईलियाटिक व हिरॅक्लिटस

हिरॅक्लिटसचे तत्वज्ञान हे ईलियाटिक तत्वज्ञानाच्या पूर्णपणे विरुध्द आहे.ईलियाटिक तत्वज्ञानाप्रमाणे फक्त सत्ता अविकारी व अपरिवर्तनशील असते व जे जे बदलणारे असते त्याला अस्तित्वच नसते.सर्व बदल, सर्व संभवन हे मिथ्या किंवा भासरुप असते.या उलट हिरॅक्लिटसच्या मते जे जे बदलणारे, परिवर्तनशील व विकारी असते फक्त तेच सत्य असतेआणि जे अविकारी, नित्य, शाश्वत असते ते भासरुप व मिथ्या असते.

आपले म्हणणे लोकांना समजत नाही. कारण त्यांना विचार करण्याची इच्छाच नाही.लोगोसची प्राप्ती त्यांना होवू शकते, त्याचे आकलन त्यांना शक्य आहे पण त्यांना प्रयत्नच करावयाचे नाहीत, अशी हिरॅाक्लिटसची तक्रार आहे.म्हणूनच त्यांना हे तत्त्वज्ञान कळाले अन न कळाले काय, याची त्याला फिकीर नाही.

बौध्ददर्शनाच्या सतत परिवर्तनाचा 'सर्व क्षणिकं क्षणिकं' च्या सिध्दान्ताशी जुळणारा हिरॅक्लिटसचा दृष्टिकोन आहे. हिरॅाक्लिटसचे तत्वज्ञान बुध्दाच्या तत्वज्ञानाशी फारच जुळते आहे.

**Heraclitus**
(535 – c. 475 BC)
pre-Socratic Greek philosopher
he was called
"The Obscure"
And
the "Weeping Philosopher



## 1.3. सोफिस्ट : सापेक्षतावाद आणि संशयवाद

सोफिस्टांच्या मते ज्ञानाचे साधन केवळ इंद्रीये हीच असून सर्व ज्ञान इंद्रियांमार्फतच होत असते.ज्ञान होते याचा अर्थ इंद्रिय *संवेदना* मिळतात. वेगळ्या भाषेत ज्ञान केवळ संवेदनांचेच असते.आणि संवेदनांचा विषय केवळ भौतिक जग हेच आहे.म्हणूनच व्यक्तीगत पातळीवर माणसाला मिळणारे इंद्रियसुख हेच ज्ञानाचे मुख्य विषय आहेत.तेच जीवनात महत्वाचे असतात.त्यांच्या मते ज्ञान बुध्दिने अथवा विवेकशक्तीने होवू शकत नाही.'सत्याचे ज्ञान ' अशी काही संकल्पनाच नसते, असेही सोफिस्टांचे म्हणणे होते.

सोफिस्टांच्या मतानुसार इंद्रियसंवेदनामार्फत ज्ञान होते.पण ते सतत बदलते असते.ज्याच्या त्याच्यापुरते ते सत्य असते.जे स्थिर होते, अपरिवर्तनीय असते ते ज्ञान नसते,तर असत्य असते.

प्लेटो हे मत खोडतो.त्याच्या मते बदलत्या जगाचे ज्ञानही बदलत राहिले तर आपणास निश्चित ज्ञान होवू शकत नाही.ते ज्ञानही सतत बदलते,क्षणभंगुर आणि तात्पुरतेच राहाते.पाण्यात बुडालेली काठी वाकडी दिसते म्हणून ती वाकडी असत नाही. तिचे खरे स्वरुप वेगळेच असते.ज्याला जसे ज्ञान होते तसे ते असते, असे म्हंटले तर सत्य व असत्य यात फरक करणे शक्य होणार नाही.असे झाल्यास लोक असत्यालाच सत्य समजतील आणि सत्याला असत्य समजतील मग एकच गोंधळ होईल.सोफिस्टांची ही भूमिका अतिरेकी, व्यक्तिकेंद्री,सापेक्ष,चंचल,फसवे,उथळ व परस्परविरोधी आहे.त्यात अचूकता,स्थिरता,एकवाक्यता नाही.

प्लेटोच्या मते सोफिस्ट ज्याचे गुणगान गातात ते जग ही सतत बदलणारी वस्तू आहे. साहजिकच जगाचे ज्ञानही बदलत राहते. ज्ञान चंचल,सतत बदलत असल्याने नेमके कशाचे ज्ञान होत आहे,हे सांगणे शक्य होत नाही.अशा ज्ञानाला 'ज्ञानाचा दर्जा' प्राप्त होवूच शकत नाही.मग ते निसर्गाचे असो की मानवी समाजाचे असो , मानवी मूल्यांचे असो, ते सत्यज्ञान असू शकत नाही.शिवाय भौतिक जग इतके अमर्याद आहे की त्याचे ज्ञान माणसाला होणे जवळपास अशक्यच असते.त्यामुळे त्यामागे धावणे चुकीचे आहे.

दुसरे असे की संवेदनांमार्फत मिळणारे इंद्रियसुख क्षणभंगुर असते.ते वासना सतत निर्माण करीत राहते.त्यातूनच व्यक्ती व समाज अनैतिक वर्तन करतात. शोषण, विषमता, अन्याय यांचा उगम इंद्रिय सुखातूनच होतो.याचाच अर्थ ज्ञानाची सोफिस्टांची कल्पना समाजात दुर्गुण पसरविते.अनाचार माजविते.

थोडक्यात सोफिस्टांनी मांडलेल्या ज्ञानशास्त्रातूनज्ञानाच्या क्षेत्रात आणि नीतीच्या क्षेत्रात साक्षेपतावाद आणि संशयवाद निर्माण झाला.सोफिस्ट तत्त्वज्ञांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानामुळे सामाजिक अराजक माजले होते.लोकशाहीचा चुकीचा अर्थ लावला जावून अनैतिकताच पसरली होती.लोकशाही काही मूठभर धनिकांच्या हातचे खेळणे बनली होती.लोकशाहीची ही संकल्पना संकुचित व मर्यादित होती. 'सत्य' या संकल्पनेविषयीचे अज्ञान आणि चुकीची व दिशाभूल करणारी ज्ञानाची संकल्पना, हेच अथेन्समधील तत्कालिन सर्व प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील अराजकाचे कारण होते.

## 1.4 : सॉक्रेटीस : मूल्ये, ज्ञानाची संकल्पना :
## सद्गुण म्हणजे ज्ञान

सॉक्रेटीसला ज्ञानाची आराधना करावयाची होती.पण केवळ ज्ञानाकरिता ज्ञान ही त्याची हटवादी भूमिका नव्हती.ज्ञानाने माणसाचे नैतिक आचरण व जीवन पवित्र आणि उच्च पातळीवर जावे, याबाबत तो आग्रही होता. आपण किती व कसे बुध्दिमान आहोत, याचा अहंकार माणसाने दाखविणे, हा मानवी ज्ञानाचा गैरवापर आहेच, पण तो ईश्वराचा अधिक्षेप आहे ; असे त्याचे मत होते.

### ज्ञानाची संकल्पना : मत व ज्ञान

ज्ञान म्हणजे काय ? हे स्पष्ट करण्यासाठी सॉक्रेटीस मत व ज्ञान यात फरक करतो.त्याच्या मते मत इंद्रियानुभवावर अवलंबून असते आणि ज्ञान हे संकल्पनांचे असते.मत व्यक्तीगत,खासगी असते.ज्ञान सार्वजनिक वस्तुनिष्ठ असते.

### ज्ञान हे संकल्पनांचेच

सॉक्रेटीसच्या मते ज्ञान हे नेहमी संकल्पनांचेच असते.ते इंद्रिय संवेदनांचे नसते.संवेदना व्यक्तिगणिक बदलतात.त्या व्यक्तीनिष्ठ असतात.ज्ञान मात्र वस्तुनिष्ठ व सार्वत्रिक असतात.त्या सर्वांसाठी सर्वांना लाभणाऱ्या असतात.सर्वांना होणारे ज्ञानाचे दर्शन एक आणि एकमेवच असते.ते सत्याचे ज्ञान असते.सत्य हा ज्ञानाचा विषय

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner


Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

असतो.ते संकल्पनांद्वारेच अभिव्यक्त होते.असे वस्तुनिष्ठ सत्य एकच आहे ते म्हणजे सद्‌गुण होय, असे तो म्हणतो.

सद्‌गुण म्हणजे ज्ञान असे समीकरण सॉक्रेटीस मांडतो.आता ज्ञान कशाचे बनते ? सद्‌गुण म्हणजे नेमके कोणते गुण ? असे प्रश्न उपस्थित होतात.

**Socrates**
( 469 BC – 399 BC)
a classical
GreekAthenian philosopher.
one of the founders of
Western philosophy,
an enigmatic figure





## ज्ञान आणि सद्‌गुण एकच

त्याच्या मते ज्ञान हे व्यक्तीगत पातळीवरील मतांचे नसते, तर ज्ञान केवळ संकल्पनांचे होते.आता, या संकल्पना कोणत्या ? सॉक्रेटीसच्या मते ज्यामुळे माणूस सद्‌गुणी होतो अशा त्या संकल्पना आहेत. प्रज्ञान ( शहाणपण ), धैर्य, दूरदर्शीपणा, आत्मसंयम अशा मुख्य चार संकल्पना आहेत.त्यांचा ( आणि त्यासारख्या इतर संकल्पनांचा ) सद्‌गुणांमध्ये समावेश होतो.ज्यास आपण सद्‌गुण समजतो अशा प्रकारच्या सर्व कृतीमध्ये हे चार सद्‌गुणघटक समान असतात.

आता, हे चाही सद्‌गुण वेगवेगळे आहेत का ? तर सॉक्रेटीसच्या मते "सर्व सद्‌गुण याचा अर्थ एकच गोष्ट आणि ती म्हणजे ज्ञान'' (All virtues are one thing and the thing is knowledge ) याचा अर्थ असा की या चारही सद्‌गुणांमध्ये जरी सकृतदर्शनी वेगळेपण दिसले तरी ते परस्परांशी इतके निगडीत आहेत की ते भिन्न नसून एकच आहेत ! ज्ञान ही ज्ञानाच्या घटकांची सुव्यवस्थित एकता आहे. ती सत्याची रचना आहे आणि त्यामुळेच तिचे सर्व घटक परस्परांशी सुसंगत असतात.परिणामी हे सर्व चारही सद्‌गुण म्हणजे एकाच सद्‌गुणाला दिलेली नावे आहेत. वास्तवात खरा सद्‌गुण एकच.हे जाणणे हेच ज्ञान.

हे चार सद्‌गुण जाणणे म्हणजेच खऱ्या अर्थाने आपल्यासाठी शुभ काय आहे, याचे अंर्तज्ञान[17] होणे होय. या अंर्तज्ञानानेच मानवी आत्म्याचे आरोग्यरक्षण होते आणि जीवनात संगीत निर्माण होते.ज्ञान आणि सद्‌गुण या दोन वेगळ्या गोष्टी नसून एकच आहेत.याचा अर्थ असा की ' खरा प्रज्ञानी माणूस तोच की जो योग्य काय आहे, हे जाणतो आणि म्हणूनच योग्य तीच कृती करतो ' . जाणणे आणि कृती करणे एकच आहे, हे जाणून कृती करणे हा सद्‌गुण होय.

याचाच अर्थ असा की कुणीही जाणूनबुजून वाईटाची निवड करीत नाही,ती अजाणतेपणी ( योग्य काय हे न जाणल्यानेच ) घडणारी गोष्ट आहे. या भूमिकेला 'नैतिक विवेकवाद' (ethical intellectualism )[18] म्हंटले आहे.तेव्हा सद्‌गुण म्हणजे ज्ञान आणि दुर्गुण म्हणजे अज्ञान होय. सद्‌गुण व ज्ञान यांची एकात्मता पाहता सद्‌गुणांचे ऐक्य कसे होते ? हा मुद्दा उपस्थित होतो.तीच सर्वोत्तमता होय.

---

[17]फ्रेडरिक कोपलस्टन *' हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी '* पान 111
[18]फ्रेडरिक कोपलस्टन *' हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी '* पान 109

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
---



## सर्वोत्तमता (excellence) :

साधारणपणे असे समजले जाते की मानवी सर्वोत्तमता कला, साहित्य, संगीत, धर्म, ईश्वर, भक्ति अशा अनेक गोष्टीमध्ये दडलेली असते.ती केवळ ज्ञानात नसते.पण सॉक्रेटीसच्या मते मानवी सदगुण हीच मानवाची सर्वोत्तमता असते. प्रज्ञान,धैर्य,दूरदर्शीपणा,आत्मसंयम या चार सद्गुणांचा समूह हीच सर्वोत्तमता (excellence) असते.

सर्वोत्तमता केवळ ज्ञानातच ती दडली आहे, असे सॉक्रेटीस का म्हणतो ?[19] एखादा कारागिर आणि नवशिका यात फरक काय असतो ? तर '' नेमके काय आणि कसे '' करावे लागेल याचे ज्ञान कारागिराकडे असते, ते नवशिक्याकडे नसते.' काय आणि कसे ' हे जाणणे म्हणजे तंत्र[20] जाणणे होय. तेच तंत्र नीतीतज्ञाकडे असते.मानवी सर्वोत्तमता ही नैतिक कारागिरीच असते.ते एक तंत्रच असते.जसे डॉक्टरला मानवी शरीराची रचना आणि निरोगीपणासाठी काय करावे लागेल याचे ज्ञान असते; त्याप्रमाणे नीतितज्ञाला नीतीचे ज्ञान असते.व्यक्ती व समाज यांचे नैतिक आरोग्य राखण्यासाठी काय करावे लागेल, याचे भान नीतीतज्ञाकडे असते. सर्वोत्तमतेचे तंत्रज्ञान नीतीतज्ञाला असते. आणि तेच ज्ञान तो इतरांना देवू इच्छित असतो.

थोडक्यात सॉक्रेटीस असे दाखवितो की सामान्य लोक ज्याला नैतिक ज्ञान समजतात ते केवळ त्यांचे खासगी मत असते. कारण त्या मतात कोणतीही संकल्पना स्पष्ट केलेली नसते. उलट ज्ञान संकल्पनांनी बनते. ते वस्तुनिष्ठ, सत्य व सार्वजनिक असते.आणि ते नेहमीच सद्गुणांचे असते. सर्वोत्तमता व्यक्त होण्यासाठीच व्यक्तीला आत्मज्ञान होणे आवश्यक आहे.ते ज्ञान लाभले की सद्गुणाचे खरे ज्ञान होते.चांगली कृती होण्यासाठी सद्गुणाचे ज्ञान असावेच लागते.

ज्ञान म्हणजेच सद्गुण असे म्हणताना सॉक्रेटीसच्या मनात कोणत्याही प्रकारचे सामान्य दर्जाचे ज्ञान अपेक्षित नव्हते.त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता की ज्ञान होणे = व्यक्तीला *अंत:प्रेरणेतून वास्तव अर्थाने योग्य काय ते पटणे* होय. म्हणजे नेमके काय ? येथे 'योग्य' याचा अर्थ पाहिला पाहिजे.तर ज्ञानाचा हेतूही लक्षात येईल.

## ज्ञानाचा हेतू : सद्गुण म्हणजे सुख (Virtue is happiness)

सॉक्रेटीसच्या मते तीच कृती योग्य असते जी माणसाला खरी उपयुक्त ठरते.कृतीचा खरा उपयोग माणसाला सुख मिळण्यातच असतो.सुखाचा लाभ हा सुजीवनाचा गाभा असतो.प्रत्येकाला सुख हवेच असते.पण प्रत्येक कृती सुखकारक असेलच असे नसते.दारुड्याला दारुत सुख मिळते.पण म्हणून सतत दारु पिणे सुखावह नसते.दारुलाच सुख मानल्याने तो व्यसनासक्त होतोच पण असा माणूस स्वत:ची ओळख विसरतो.माणसाची स्वत:ची ओळख विवेकशील प्राणी अशी असते.त्यापासून व्यसनी माणूस दूर जातो.

स्वत:ची ही विवेकशीलतेची ओळख विसरणे हे अज्ञान असून त्यापोटी माणूस वाईटाकडे झुकतो.जर त्याने जर जाणले की स्वत:चे सुख कशात आहे तो पिणार नाही.हे अर्थातच अंत:प्रेरणतून जाणवते.तेंव्हा सद्गुण कशासाठी ? तर सद्गुण सुखासाठी.म्हणून 'सद्गुण म्हणजे सुख'[21] असा उपसिध्दान्त सॉक्रेटीस मांडतो.योग्य म्हणजे उपयुक्त.

---

[19] ' नॉर्मन मेलशेट *' दि ग्रेट कॉन्व्हर्सेशन '* पान 67 पाचवी आवृत्ती 2007 ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेस.

[20] Techne या मूळ ग्रीक शब्दाचा अर्थ तंत्र.त्यापासूनच technology - तंत्रज्ञान हा शब्द बनतो.तोच नीतीच्या ज्ञानासाठी सॉक्रेटीसला अभिप्रेत आहे,असे नॉर्मन मेलशेट म्हणतो.

[21] गो.वि. तुळपुळे *ग्रीक तत्त्वज्ञान* पान 283

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

ज्ञानाचा फायदा आत्म्याला होतो.सॉक्रेटीस आत्म्याचे अस्तित्व स्वीकारतो. विवेकशक्ती ही आत्म्यात निवास करते.प्रत्येक व्यक्तीत आत्मा असतो. प्रत्येकाला सद्‌गुणाचा फायद होवू शकतो.चांगलेपणाचे ज्ञान असणे म्हणजे शुभकृती करणे.त्याचा दैनंदिन जगण्यात वापर करणे. आत्मा बौध्दिक आणि नैतिक व्यक्तीत्वाचा असा घटक आहे की जो जाणणे आणि त्याप्रमाणे कृती करणे यांना जबाबदार असतो.आत्मा हेच व्यक्तिचे सारतत्व असून व्यक्तीची विवेकशीलता आत्म्यातूनच प्रकट होते.सद्‌गुणी असणे याचाच अर्थ आत्म्याचे आरोग्य सांभाळणे असते.



## सद्‌गुणांचे शिक्षण

आता शिकवून माणूस सद्‌गुणी होवू शकतो का ? तर ते शक्य आहे.ज्ञान किंवा शहाणपण शिकविणे शक्य आहे,याचा अर्थ सद्‌गुणांची शिकवणेही शक्य आहे.सद्‌गुणाचा अर्थ बौध्दिकदृष्ट्या शिकविणे शक्य आहे, पण खुद्द सद्‌गुण शिकविणे शक्य आहे का ? सॉक्रेटीसच्या मते जर माणसाची ज्ञान अंत:प्रेरणेतून जाणवत असेल तर सद्‌गुणही शिकविता येतात. पण शिकविणे म्हणजे व्याख्यानबाजी करणे नाही तर सॉक्रेटीक पध्दतीने व्यक्तीला अंत:प्रेरणेकडे घेवून जाणे होय. अंत:प्रेरणा हे विवेकशक्तीचेच नाव आहे. याचाच अर्थ जशी कारागिरी शिकविता येते तसे सद्‌गुण शिकविता येतात.

## ज्ञानाचे साधन : विवेकशक्ती

पण सद्‌गुणांचे ज्ञान कोणत्या साधनाने होते? तर ज्ञानाचे साधन एकमेव आहे माणसाची सदसद्‌विवेकशक्ती !! विवेकशक्ती ही नीतीचे परमोच्च साधन आहे. विवेकशक्तीच्या साह्यानेच माणसाने परीक्षण केले पाहिजे.सॉक्रेटीसच्या मते माणसाचे शरीर पंचमहाभूतांनी बनले आहे, हे बरोबर आहे.पण विचार करणारे मानवी मन किंवा विवेकशक्ती कशाने बनते ? तर त्याच्या मते या विश्वात एक व्यापक सर्वहित साधणारी विवेकशक्ती आहे. आणि मानवी विवेकशक्ती ही एका वैश्विक मनाचा [22], विवेकशक्तीचा हिस्सा आहे.

हे परीक्षण दोन रितीने करता येते.आत्मपरीक्षण आणि समाजपरीक्षण. ''स्वत:ला ओळखा'' ( Know thyself )[23] असे सॉक्रेटीस सांगतो.स्वत:ला ओळखता यावे यासाठीच माणसाने आपले परीक्षण केले पाहिजे.म्हणूनच तो परीक्षण न केलेले जीवन तो हीन दर्जाचे समजतो.इतरांच्या परीक्षणासाठी सॉक्रेटीक पध्दती वापरता येते.

## साध्यसाधनवाद

वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर सॉक्रेटीसच्या मते जग किंवा कोणतीही वस्तू स्वत:हून चांगली किंवा वाईट नसते.तर चांगलेपणाचे आपले ज्ञान तिला चांगले बनविते किंवा चांगलेपणाविषयीचे अज्ञान तिला वाईट बनविते.(जगात चांगले किंवा वाईट असे काही नसते,आपला विचार तसे बनवितो, असे 16 व्या शतकातील इंग्लीश नाटककार शेक्सपीअर म्हणतो.) ती वस्तू साधन म्हणून वापरावी की साध्य म्हणून वापरावी, याचा निर्णय विवेकशक्ती घेत असते.

---

[22] या विश्वात एक सर्वव्यापी मन आहे, ही संकल्पना सर्वप्रथम ॲनाक्झिमेंडर (इ.स.पू.612 ते 547) या तत्ववेत्त्याने मांडली होती. सॉक्रेटीसने ती त्याच्यापासून घेतली. तिचा मानवी मनाशी संबंध जोडून नीतीला भक्कम पाया दिला.

[23] हे वचन मुळात सॉक्रेटीसपूर्व प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ ' लॅसिडिमॉनचा चिलॉन ' याचे आहे.प्राचीन ग्रीसमध्ये *'सात शहाणे'* या नावाने ओळखले जाणारे सात तत्त्वज्ञ होते.चिलॉन त्यापैकी एक होता.हेच वचन डेल्फीच्या मंदिरावर कोरलेले होते.तेच नंतर सॉक्रेटीसच्या नैतिक तत्त्वज्ञानाचे मूळ स्त्रोत बनले.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

सर्वसाधारण माणसे साधनमूल्ये आणि साध्यमूल्ये यात फरक करीत नाहीत. साधनालाच ते साध्य समजतात आणि साध्य मग आणखी दूर जाते.संपत्ती, सत्ता,मान, प्रतिष्ठा इत्यादी साधने आहेत.तर प्रज्ञान, धैर्य,दूरदर्शीपणा, आत्मसंयम ही साध्ये आहेत. पण अज्ञानामुळे साधनसाध्यात गोंधळ घालून माणसे जीवनाची पातळी बिघडवितात.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner